**सुविचार**
**यह आँखे प्रभु का विशेष उपहार हैं, इनके द्वारा दूसरों को प्रेम, शान्ति व खुशी का दान करो।**
(ब्रह्मकुमारीज)

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र
दैनिक

# यशवंत

**मामा मतदान करून बाहेर आले.**
पोलिंग एजंट ला विचारले – तुझी मामी मतदान करून गेली का?.
पोलिंग एजंटाने व्यवस्थित लिस्ट पाहून सांगितले – हो गेल्या.
मामा रडक्या आवाजात, – लवकर आलो असतो, तर तीची भेट झाली असती. !
पोलिंग एजंट – कां, मामी तुमच्या सोबत नाही राहात ?
मामा : तिला देवाघरी जाऊन १५ वर्ष झाली, आणि प्रत्येक वेळी मतदानाला येते आणि मतदान करून जाते, ...
पण माझी भेटच होत नाही.
**भारतीय लोकशाही**

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/गुरुवार दि. २१ मार्च २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१२७ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦


# पुतिन, झेलेन्स्की यांच्याशी पंतप्रधान मोदींची चर्चा

## लोकसभा निवडणुकीनंतर दौरा करण्यासाठी निमंत्रण

नवी दिल्ली –रशिया–युक्रेन युद्धाला दोन वर्ष झाल्यानंतरही या संघर्षातून काहीही तोडगा निघालेला नाही. या संघर्षादरम्यान आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी टेलिफोनद्वारे युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांच्याशी चर्चा केली. या संभाषणात दोन्ही नेत्यांनी रशिया–युक्रेन संघर्षातून मार्ग काढणे आणि युक्रेनला मानवतावादी मदत पुरविण्यावर चर्चा केली. दोन्ही देशांमध्ये शांतता प्रस्थापित करणे आणि या संघर्षाला लवकरात लवकर संपविण्यासाठी भारत प्रयत्नशील असल्याचे पंतप्रधान मोदी यांनी अधोरेखित केले. या संभाषणाती माहिती पंतप्रधान मोदी यांनी स्वतः आपल्या एक्स अकाऊंटवर दिली आहे. तर रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्याशीही मोदींची चर्चा झाल्याचे एएनआय वृत्तसंस्थेने म्हटले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये सांगितले, भारत–युक्रेन या देशातील भागीदारी आणखी बळकट करण्याबाबत राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांच्याशी चर्चा केली. सध्या सुरू असलेल्या संघर्षाला लवकर संपवून शांतता प्रस्थापित करण्यासाठी भारत अविरत प्रयत्न करत आहे, असे त्यांना सांगितलं. भारत यापुढेही युक्रेनला मानवतावादी मदत पुरवत राहिल, असे आश्वस्त केले.

राष्ट्राध्यक्ष पुतिन यांच्याशीही चर्चा

झेलेन्स्की यांच्याशी चर्चा होण्याआधी पंतप्रधान मोदी यांनी व्लादिमिर पुतिन यांच्याशीही बातचीत केली. यावेळी पुतिन यांच्या पाचव्या कार्यकाळासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच रशिया–युक्रेन संघर्षातून मार्ग काढण्याबाबत पुढे जाण्यासंदर्भात सुतोवाच केले.

# काँग्रेस महाराष्ट्रात १८ जागांवर लढणार

## ७ उमेदवार निश्चित, गुरूवारी बैठक

नवी दिल्ली : भाजपकडून एकीकडे २० उमेदवारांची नावे जाहीर झाली असली तर महाविकास आघाडीकडून अद्याप लोकसभा निवडणुकीसाठी जागावाटपाचा फॉर्म्युला ठरलेला नाही. महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांची उद्या (गुरूवारी) मुंबईत महत्त्वाची बैठक होणार आहे. या बैठकीत जागावाटपाबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल आणि मग जागावाटप जाहीर होण्याची शक्यता आहे. दरम्यान, दिल्लीत काँग्रेसची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली आहे. या बैठकीत महाराष्ट्रात काँग्रेस १८ जागांवर निवडणूक लढणार असल्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब झाले आहे.

दिल्लीत आज (बुधवारी) काँग्रेसच्या केंद्रीय निवडणूक समितीची बैठक पार पडली. या बैठकीत प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात, आमदार सतेज पाटील यांचा समावेश होता. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि माजी राष्ट्रीय अध्यक्षा सोनिया गांधी यांच्या उपस्थितीत ही बैठक पार पडली. या बैठकीत महाराष्ट्रात ४८ पैकी १८ जागांवर निवडणूक लढवण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब झाले.

शरद पवार आणि ठाकरे गट ३० जागांवर लढणार?

काँग्रेस केंद्रीय निवडणूक समितीची जवळपास पाऊण तास बैठक पार पडली. या बैठकीत महाराष्ट्रात १८ जागांवर निवडणूक लढण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब झाले. ३० जागांचे गणित राष्ट्रवादीचा शरद पवार गट आणि शिवसेनेच्या ठाकरे गटाला सोडवावा लागणार आहे. **(पान ७ वर)**

## मुंबईत उष्णतेच्या लाटेचा इशारा

मुंबई : मुंबईमध्ये उन्हाचा ताप आता जाणवू लागला असून उद्या, गुरुवारपर्यंत मुंबईच्या तापमानाचा पारा आणखी चढण्याची शक्यता आहे. हे तापमान ३८ अंशांपर्यंत पोहोचू शकते, असे प्रादेशिक हवामान विभागाने म्हटले आहे. मुंबईचे कमाल तापमान मंगळवारी अवघ्या २४ तासांमध्ये २.२ अंशांनी वाढले. कोकणामध्ये दमट आणि उष्ण हवामानामुळे अधिक त्रास जाणवू शकतो, असाही अंदाज वर्तवण्यात येत आहे.

मुंबईत मंगळवारी कुलाबा येथे ३२.२ तर, सांताक्रूझ येथे ३४.२ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. सोमवारपेक्षा **(पान ७ वर)**

# जाहिरातबाजीवर ३ महिन्यांत १०० कोटी खर्च

नवी दिल्ली : – लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांनी जाहिरातबाजीवर जोर दिला आहे. त्यात ऑनलाईन जाहिराती वाढल्या आहेत. यात पोर्टलदेखील मागे नाहीत. त्यात गेल्या काही महिन्यांत विविध राजकीय पक्षांनी गुगलच्या माध्यमातून त्यांचा जाहिरात खर्च वाढवला आहे. राजकीय जाहिरातींवरचा खर्च गेल्या ३ महिन्यांत मार्चपर्यंत जवळपास १०० कोटींवर पोहोचला आहे. ही रक्कम गेल्या वर्षीच्या ११ कोटी रुपयांपेक्षा ९ पट अधिक आहे. या अशा जाहिराती आहेत ज्या राजकीय पक्षांच्या चिन्हांसह आहेत. ही आकडेवारी १७ मार्चपर्यंतची आहे.

निवडणूक आयोगाने गेल्या शनिवारी लोकसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर केल्या आहेत. गेल्यावेळेप्रमाणे यंदाही ७ टप्प्यात मतदान होणार आहे. पहिल्या टप्प्यासाठी १९ एप्रिलला मतदान होणार आहे, तर सातव्या आणि शेवटच्या टप्प्यासाठी १ जूनला मतदान होणार आहे.निवडणुकीचा निकाल ४ जूनला लागणार आहे. यावेळी सत्ताधारी भारतीय जनता पक्ष (भाजप) विजयाची हॅट्रिक करण्याचा प्रयत्न करत आहे, तर विरोधी पक्षांनीदेखील जोर लावला आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी आता चुरशीच्या लढती होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर ऑनलाईन जाहिराती वाढल्या आहेत. गूगलच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात जाहिरातबाजी केली जात आहे.

२०१९ पासून (गुगलने डेटा गोळा करण्यास सुरुवात केली तेव्हापासून) तीन महिन्यांत गुगलवर राजकीय जाहिरातींसाठी केलेला सरासरी खर्च सर्वाधिक होता. या आकड्यांमध्ये सर्च, डिस्प्ले, यूट्यूब आणि जी मेलवर दाखवलेल्या जाहिरातींचा समावेश आहे. गुगलला उत्तर प्रदेशातून सर्वाधिक राजकीय जाहिराती देण्यात आल्या. यानंतर ओडिशा, महाराष्ट्र, तामिळनाडू आणि गुजरातचा क्रमांक लागतो. एकूण जाहिरात खर्चापैकी ४० टक्के खर्च पाच राज्यांमधून झाला आहे.

भाजपचा सर्वाधिक खर्च

गुगलच्या आकडेवारीनुसार जानेवारीपासून भारतीय जनता पक्षाने (भाजप) सर्वाधिक जाहिराती दिल्या आहेत. भाजपने गुगल जाहिरातींवर **(पान ७ वर)**

# परिवहनच्या भंगार बसमध्ये आता महिलांसाठी शौचालय

ठाणे : ठाणे परिवहन सेवेच्या भंगार बसचा आता वापर करण्याचे पालिकेने निश्चित केले आहे. त्यानुसार या भंगार बसचे रुपांतर सुसज्ज अशा शौचालयात केले जाणार असून त्याचा वापर महिलांना करता येणार आहे.

या संदर्भातील निविदा ठाणे महापालिकेच्या घनकचरा विभागाने नुकतीच प्रदर्शित केली आहे. यात संबधींत ठेकेदाराने ती बस विकत घ्यायची असून त्यावरील येणारा खर्च देखील त्यालाच करावा लागणार आहे. या बदल्यात ठेकेदाराला ज्या ठिकाणी बस लावली जाणार आहे, तेथील २० टक्के परिसर वापरण्याचे अधिकार असणार आहेत.

ठाणे महापालिकेच्या माध्यमातून सध्या शहरातील ९०० शौचालयांची दुरुस्ती करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. त्यानुसार हे काम ८० टक्यांच्या आसपास झाले आहे. त्यानंतर आता शौचालय सफाईची मोहीम देखील महापालिकेने हाती घेतली आहे. तर स्वच्छ शहराचा एक भाग म्हणून ठिकठिकाणी नव्याने शौचालय उभारण्याचे कामही हाती घेण्यात आले आहे. याशिवाय मोबाइल टॉयलेट, कंटेनर टॉलयेल आदी संकल्पना देखील महापालिकेच्या माध्यमातून राबविल्या जात आहेत. त्यातही गर्दीच्या ठिकाणीकिंवा हायवे लगत महिलांसाठी शौचालय उभारणीला देखील प्राधान्य दिले जात आहे. त्यानुसार आता आता परिवहनच्या भंगार बसचा वापर आता शौचालयांसाठी केला जाणार असल्याची माहिती पालिका सुत्रांनी दिली आहे.

त्यानुसार पहिल्या टप्यात २ बस यासाठी घेतल्या जाणार आहेत. या संदर्भातील निविदा पालिकेच्या घनकचरा विभागाने काढली आहे. **(पान ७ वर)**

# काळा पैसा मोजतांना नोटांच्या मशिन गरम झाल्या: अमित शहा

नवी दिल्ली (वृत्तसंस्था) : नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यापासून काळ्या पैशांवर कठोरतेने कारवाई झाली आहे. ईडी काळ्या पैशांवर कारवाई करत आहे. ईडीने जेवढी संपत्ती जप्त केली आहे, त्यांतील केवळ ५ टक्के संपत्तीच राजकीय पक्षांशी संबंधित लोकांची आहे. उर्वरित ९५ टक्के काळा पैसा असलेले लोक आहेत, असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केले.

ते आज एका वृत्तवाहिनीच्या रायजिंग भारत समिटमध्ये बोलत होते. यावेळी त्यांना नेत्यांच्या घरांवरील ईडी, सीबीआय आणि इनकम टॅक्स डिपार्टमेंटच्या छाप्यांसंदर्भात प्रश्न विचारण्यात आला होता. यावेळी त्यांनी विरोधकांवर थेट हल्ला चढवला.

अमित शहा म्हणाले, राजकीय नेत्यांविरोधात कारवाईच होऊ नये, असे विरोधी पक्षांना वाटते. मात्र मी स्पष्टपणे सांगू इच्छितो की, ९५ टक्के कारवाया अशा लोकांविरोधात झाल्या आहेत, ज्यांचा राजकारणाशी काही संबंधच नाही हे सांगताना शहा यांनी ममता बॅनर्जी सरकारमधील एका मंत्र्याच्या घरावर झालेल्या कारवाईचा उल्लेख केला. ते म्हणाले, ममता बॅनर्जी सरकारमधील एका मंत्र्याच्या घरावर टाकण्यात आलेल्या धाडीत ५५ कोटी रुपये मिळाले आहेत. तर, एका कारवाईत काँग्रेसच्या एका खासदाराच्या घरातून ३५५ कोटी रुपये मिळाले. एसबीआयच्या १० मशिन नोटा मोजता–मोजता थकल्या, गरम झाल्या. तरीही कारवाई होऊ नये, असे विरोधी पक्षांच्या नेत्यांना वाटते.

अमित शहा म्हणाले, छाप्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करू नका. मोठा प्रश्न असा आहे की, काँग्रेसच्या खासदाराकडे ३५० कोटी आणि ममता बॅनर्जींच्या मंत्र्याकडे ५५ कोटी रुपये कुठून आले? नोटांचे बंडल भरण्यासाठी मॅटाडोर आणावा लागला. एक मॅटाडोर कमी पडला, म्हणून पहाटे ४ वाजता नोटा भरण्यासाठी दुसरा मॅटाडोर आणावा लागला. जनता सर्व काही बघत आहे, हे विरोधक विसरत आहेत. हा पैसा **(पान ७ वर)**

# यूपीएससीची नागरी सेवा पूर्व परीक्षा पुढे ढकलली

नवी दिल्ली : केंद्रीय लोकसेवा आयोगाने बुधवारी (दि. २०) लोकसभा निवडणुकीमुळे २६ मे रोजी होणारी नागरी सेवा पूर्व परीक्षा १६ जूनपर्यंत पुढे ढकलली आहे. भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय विदेश सेवा, भारतीय पोलिस सेवा आणि इतर अधिकारी निवडण्यासाठी यूपीएससी दरवर्षी तीन टप्प्यांत नागरी सेवा परीक्षा आयोजित करते.

यूपीएससीने सांगितले की, आगामी सार्वत्रिक निवडणुकीचे वेळापत्रक पाहता, आयोगाने नागरी सेवा पूर्व परीक्षा २०२४ पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. परीक्षेच्या काही दिवस आधी उमेदवारांचे प्रवेशपत्र ऑनलाईन जारी केले जातील. निवडणूक आयोगाने गेल्या शनिवारी १८ व्या लोकसभेच्या निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर केल्यानंतर पूर्व परीक्षेच्या तारखेत बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला. आता पूर्व परीक्षा १६ जूनला होणार असून मुख्य परीक्षा २० सप्टेंबरपासून पाच दिवस चालणार आहे.

यापूर्वी, आयोगाने नागरी सेवा परीक्षा २०२४ साठी अर्ज करण्याची अंतिम तारीख देखील वाढवली होती. अधिकृत अधिसूचनेनुसार, अर्ज करण्याची अंतिम तारीख ६ मार्चपर्यंत वाढवण्यात आली होती.

# राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांचा युगेंद्र पवारांना घेराव

पुणे : लोकसभा निवडणुकीची घोषणा होताच राजकीय पक्षांच्या प्रचारालाही सुरुवात झाली आहे. बारामती लोकसभा मतदारसंघात यंदा पवारविरुद्ध पवार असा सामना रंगणार आहे. त्यात अजित पवारांविरोधात त्यांच्या घरातील सख्ख्या भावासह इतर मंडळी उतरली आहेत. त्यात आता अजित पवारांची सोशल मीडियावर होणारी बदनामी पाहून काही कार्यकर्त्यांनी युगेंद्र पवार यांना घेराव घातला.

युगेंद्र पवार हे श्रीनिवास पवार यांचे चिरंजीव आहेत. अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी युगेंद्र पवार यांना घेराव घालत अजितदादांची सोशल मीडियात बदनामी करणाऱ्यांना आवर घाला अशी मागणी त्यांनी केली. त्यावेळी युगेंद्र पवार यांनी शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांकडून काही चुका झाल्या असतील तर त्या दुरुस्त करू असं आश्वासन दिले. सोशल मीडियात श्रीनिवास पवारांचे भाषण सध्या व्हायरल होतंय. त्यामुळे अजितदादा समर्थक जाब विचारण्यासाठी आले होते.

युगेंद्र पवार सध्या सुप्रिया सुळे यांच्या प्रचारासाठी मतदारसंघात गावभेटी दौरा करत आहेत. तर पवार कुटुंबातील इतर मंडळीही सुप्रिया सुळेंच्या प्रचारात गुंतले आहेत. त्यात नुकतेच अजित पवारांचे सख्खे बंधू श्रीनिवास पवार यांनी काही गावकऱ्यांशी संवाद साधला. त्या **(पान ७ वर)**

# चारा टंचाईतहि पशुधनाची जोपासना; पशुपालकांचे जिल्हाधिकाऱ्यांकडून कौतूक

लातूर : श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या महाशिवरात्री यात्रा महोत्सवानिमित्त आयोजित पशु प्रदर्शनास उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. या प्रदर्शनात सहभागी झालेले उत्कृष्ट पशु पाहून या पशुंचे चारा टंचाईच्या काळातही उत्कृष्ट पालन– पोषण करणाऱ्या पशुपालकांचे जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी कौतुक केले.

यात्रा महोत्सवानिमित्त जिल्हा परिषदेचा पशुसंवर्धन विभाग,लातूर पंचायत समिती व श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि.१९ )पशुपक्षी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.या पशुप्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर– घुगे यांच्या हस्ते संपन्न झाले.याप्रसंगी तहसीलदार सौदागर तांदळे,देवस्थानचे प्रशासक सचिन जांबुतकर,व्यंकटेश हालिंगे, विशाल झांबरे,ओम गोपे, बच्चेसाहेब देशमुख, यांच्यासह पंचायत समिती व पशुवंर्धन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी उपस्थित अधिकाऱ्यांकडून चारा टंचाईची माहिती घेतली.यावर्षी पर्जन्यमान कमी असल्याने चारा टंचाई जाणवण्याची शक्यता आहे. अशा स्थितीतही पशुपालक नेटाने पशुंची जोपासना करीत असल्याबद्दल त्यांनी पशुपालकांचे कौतुक केले.

या प्रदर्शनात देवणी नर एक वर्षाखालील वासरे गट,देवणी नर एक वर्षावरील वासरे गट, देवणी नर दोन दात वळू गट,देवणी नर चार दात वळू गट,देवणी नर सहा दात वळू गट तसेच देवणी मादी गटातून देवणी मादी एक वर्षाखालील वासरे गट,देवणी कालवड एक वर्षावरील गट,देवणी गाभण कालवड गट,देवणी गाभण गाय गट,देवणी गाय दुधाळ गट तर लालकंधारी नर गटातून लालकंधारी नर एक वर्षाखालील वासरे गट, लालकंधारी नर एक वर्षावरील वासरे गट, लालकंधारी नर दोन दात वळू गट,लालकंधारी नर चार दात वळु गट, लालकंधारी नर सहा दात वळू गट,लालकंधारी मादी गटातून लालकंधारी मादी एक वर्षा खालील वासरे गट,लालकंधारी कालवड एक वर्षावरील **(पान ७ वर)**

# लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सीमाभागात करण्यात आलेल्या उपाययोजनांचा संयुक्त आढावा

लातूर, / प्रतिनिधी : लोकसभा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रमानुसार लातूर मतदारसंघात आदर्श आचारसंहिता लागू झाली असून आचारसंहितेच्या अंमलबजावणीसाठी जिल्ह्यात विविध पथके स्थापन करण्यात आली आहेत. यासोबतच लातूर जिल्ह्याच्या सीमेला लागून असलेल्या कर्नाटक राज्यातील बिदर जिल्हा प्रशासनासोबत संयुक्तपणे कार्यवाही करून सीमाभागात निवडणूक काळात होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी उपाययोजना केल्या जाणार आहेत. या अनुषंगाने आढावा घेण्यासाठी आज दोन्ही जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक झाली. नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक शशिकांत महावरकर यांची या बैठकीला दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थिती होती.

लातूर जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, अतिरिक्त जिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे, राज्य उत्पादन शुल्कचे अधीक्षक केशव राऊत, जिल्हा परिषदेचे मुख्य वित्त व लेखा अधिकारी रमेश चाटे यांच्यासह उदगीर, निलंगाचे उपविभागीय महसूल अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, तहसीलदार, पोलीस निरीक्षक आणि बिदर जिल्ह्यातील पोलीस विभागाचे अधिकारी उपस्थित होते. तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे बिदरचे जिल्हादंडाधिकारी गोविंद रेड्डी, पोलीस अधीक्षक चेन्नाबसवन्ना लंगोटी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी सहभागी झाले होते.

लातूर आणि बिदर जिल्ह्याच्या सीमाभागात चेकपोस्ट आणि इतर अनुषंगिक बाबींसाठी परस्पर समन्वय ठेवून काम केल्यास मनुष्यबळाचा प्रभावी वापर करणे शक्य होईल. तसेच परस्पर सहकार्याने इतर कार्यवाही अधिक गतीने करता येईल, असे विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. महावरकर यांनी सांगितले. या अनुषंगाने त्यांनी मार्गदर्शन केले.

लातूर लोकसभा मतदारसंघ आणि लगतच्या कर्नाटक राज्यातील **(पान ७ वर)**

दैनिक
यशवंत
गुरुवार दि.२१ मार्च २०२४
२
अहमदपूर/चाकूर परिसर
E-mail :- yashahmedpur@gmail.com संपर्क मो.९८५०२७३०४७, ९८२३११२९०७

# किलबिल च्या ऋषिकेश सूर्यवंशी ची चमकदार कामगिरी

अहमदपूर दि.२०(कारामुंगीकर) किलबिल च्या ऋषिकेश सूर्यवंशी ची चमकदार कामगिरी बजावली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, ६८ वी राष्ट्रीय ज्युनिअर बॉलबॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धा पटना बिहार येथे नुकतीच आयोजित करण्यात आली होती. राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेमध्ये महाराष्ट्र संघाला तृतीय स्थान प्राप्त झाले आहे. तसेच मिश्र दुहेरीमध्ये सुद्धा तृतीय स्थान प्राप्त केले. खेळाडूंनी राज्य संघाला समिश्र यश प्राप्त करून दिले.

सदरील संघात किलबिल नॅशनल स्कूल शाळेचा ऋषिकेश विलास सूर्यवंशी या खेळाडूने नेत्रदीपक कामगिरी करत संघाला विजय मिळवून दिला. सदरील विद्यार्थ्यांस पोलीस अधिकारी असद शेख यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले.

# सात मे ला मतदान हक्क बजावू या...!

## चापोली येथे लोकगीतातून मतदार जनजागृती

अहमदपूर दि.२०(कारामुंगीकर) सात मे ला मतदान हक्क बजावू या...! या लोकगीतातुन येथुन जवळच असलेल्या चापोली येथे मतदार जनजागृती करण्यात आली.

याबाबत अधिक माहिती अशी की, लातूर लोकसभा विभागाच्यावतीने जिल्हातील मतदार बंधू भगिणीमध्ये जनजागृती निर्माण व्हावी यासाठी स्वीप कलापथकाद्वारे चाकूर तालुक्यातील चापोली येथे प्रबोधनात्मक लोक गीताच्या माध्यमातून लातूर लोकसभा मतदारसंघातील मतदानाचा टक्का वाढण्यासाठी जनजागृती करण्यात आली.

यावेळी मतदारांनी शंभर टक्के मतदान करावे असे जाहीर आवाहन करण्यात आले.या अभियानांसाठी जिल्हाधिकारी वर्षा घुगे-ठाकुर मॅडम सहाय्यक निवडणूक अधिकारी मंजुषा लटपटे, तह-सीलदार शिवाजी पालेपाड,चाकूर चे तहसीलदार नरसिंग जाधव, गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे यांच्या मार्गदर्शनाखाली मतदारसंघात जनजागृती कार्यक्रम करण्यात येत असून हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्वीपचे सदस्य महादेव खळुरे, शिवकुमार गुळवे, मोहन तेलंगे, बस्वेश्वर थोटे, शरद हुडगे, चंद्रकांत पेड, पुरुषोत्तम काळे, श्रीमती अर्चना माने, ना-गनाथ स्वामी, धनंजय नाकाडे यांच्यासह तलाठी पी.एस.वैद्य, ग्रामसेवक एस.ए.कुरुळेकर व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले. सदरील जनजागृती कार्यक्रमात परिसरातील नागरिक, महिला मतदार बंधू भगिणिनी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# महात्मा फुले महाविद्यालयाने केला सुषमाताई केंद्रेंचा सत्कार

अहमदपूर दि.२०(कारामुंगीकर) महात्मा फुले महाविद्यालयाने केला सुषमाताई केंद्रेंचा सत्कार करण्यात आला.

याबाबत अधिक माहिती अशी की, येथील महात्मा फुले महाविद्यालयास सुषमाताई अशोकराव केंद्रे यांनी सदिच्छा भेट दिली त्यावेळी महा विद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांनी त्यांचा सत्कार करून पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

सुषमाताई केंद्रे ह्या जिल्हा परिषद लातूरचे माजी सदस्य अशोकराव केंद्रे तसेच पंचायत समिती अहमदपूरच्या माजी सभापती सौ अयोध्या ताई केंद्रे यांच्या सुकन्या आहेत. आई-वडिलांकडून सामाजिक कार्याचा वसा त्यांना लाभला असून त्या पुणे येथे सामाजिक संस्थेच्या माध्यमातून सक्रियपणे समाज कार्य करतात.

त्यांनी महात्मा फुले महाविद्यालयास सदिच्छा भेट दिल्याबद्दल प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांनी त्यांचा यथोचित सत्कार करून पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी उपप्राचार्य प्रो. डॉ. दुर्गादास चौधरी , समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. सतीश ससाणे, पंचायत समिती अहमदपूरच्या माजी सभापती सौ. अयोध्याताई केंद्रे , रुई (द.) येथील सामाजिक कार्यकर्ते गणेश मामा पांचाळ आदींची उपस्थित होती.

**टी.सी. हरवली आहे**

**पठाण रहीम अमीर** या नावाची यशवंत ज्यु. कॉलेज, अहमदपूर येथील १२ वी एम.सी.व्ही.सी. पासची टी. सी. टाकळगाव ते अहमदपूर प्रवासादरम्यान दिनांक १५ मार्च २०२४ रोजी हरवली आहे.

सदरील टी.सी. कोणास सापडल्यास खालील मोबाईलवर संपर्क करावा.
मो. नं. ९५७९९३९२४८

**टी.सी. हरवली आहे**

वाजिद इस्माईल कासार या नावाची श्री महेश विद्यालय शिरूर ताजबंद येथील नववी पासची टी.सी. अहमदपूर ते शिरूर ताजबंद प्रवासादरम्यान हरवली आहे.

सदरील टीसी कोणास सापडल्यास खालील मोबाईलवर संपर्क करावा.

मो. नं.९५६१३०१६९०


## जगत् जागृति शिक्षण प्रसारक मंडळ, चाकूर

ता. चाकूर, जि. लातूर -४१३५१३

### कामाचे दरपत्रक (कोटेशन) मागणी सूचना

जगत् जागृति शिक्षण प्रसारक मंडळ, चाकूर ता. चाकूर जि. लातूर व्दारे संचलित, साने गुरुजी छात्रालय, चाकूर येथे छात्रालयातील विद्यार्थ्यांकरीता निम्नलिखीत वर्णनाप्रमाणे लोखंडी बंक बेड डबल बेड बनविण्याकरीता कोटेशन मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुकांनी आपापले कोटेशन दिनांक २५/०३/२०२४ पर्यंत संस्था कार्यालयात सादर करावेत. आपापल्या कोटेशनचे दर हे जी.एस. टी. समाविष्ट करुन देण्यात यावेत.

| अ.क्र. | तपशील | साईज | नग | निविदा सादर करावयाचा अंतिम कालावधी |
|---|---|---|---|---|
| ०१ | लोखंडी बंक बेड ( डबल बेड ) | २.६ X ६ X ८ | ४१ | दिनांक २५/०३/२०२४ दुपारी ०४.०० पर्यंत |

१. अधिक माहीतीसाठी इच्छुक कोटेशन देणार यांनी संस्था कार्यालयाशी संपर्क साधावा.
२. जगत् जागृति शिक्षण प्रसारक मंडळ, चाकूर यांनी कोटेशनमधील संख्या कमी/अधिक करण्याचे आणि कोणतेही कारण न देता कोटेशन नाकारण्याचे अधिकार स्वत:कडे राखून ठेवलेले आहेत.

सचिव,
जगत् जागृति शिक्षण प्रसारक मंडळ,चाकूर

## जगत् जागृति शिक्षण प्रसारक मंडळ, चाकूर

ता. चाकूर, जि. लातूर -४१३५१३

### कामाचे दरपत्रक (कोटेशन) मागणी सूचना

जगत् जागृति शिक्षण प्रसारक मंडळ, चाकूर ता. चाकूर जि. लातूर व्दारे संचलित, जगत् जागृति प्राथमिक विद्यालय, व साने गुरुजी छात्रालय, इमारत क्रमांक २ येथील स्लॅबचे मायक्रो काँक्रीट वॉटर प्रुफींगचे काम फायबर मेशसह करण्याकरिता कोटेशन मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुकांनी आपापले कोटेशन दिनांक २५/०३/२०२४ पर्यंत संस्था कार्यालयात सादर करावेत. आपापल्या कोटेशनचे दर हे जी.एस.टी. समाविष्ट करुन देण्यात यावेत.

| अ.क्र. | तपशील | निविदा सादर करावयाचा अंतिम कालावधी |
|---|---|---|
| ०१ | जगत् जागृति प्राथमिक विद्यालय व साने गुरुजी छात्रालय येथील स्लॅबचे मायक्रो काँक्रीट वॉटर प्रुफींगचे काम फायबर मेशसह | दिनांक २५/०३/२०२४ दुपारी ०४.०० पर्यंत |

२. अधिक माहीतीसाठी इच्छुक कोटेशन देणार यांनी संस्था कार्यालयाशी संपर्क साधावा.
३. जगत् जागृति शिक्षण प्रसारक मंडळ, चाकूर यांनी कोटेशनमधील संख्या कमी/अधिक करण्याचे आणि कोणतेही कारण न देता कोटेशन नाकारण्याचे अधिकार स्वत:कडे राखून ठेवलेले आहेत.

सचिव,
जगत् जागृति शिक्षण प्रसारक मंडळ,चाकूर

## जाहीर प्रगटन

क्रमांक / न. भु./बा.क्र. ०८/२०२४
उपअधिक्षक, भुमी अभिलेख, अहमदपूर
दिनांक : १८/०३/२०२४

या जाहीर पगटणाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार **श्री व्यंकट सोपान गुरमे** यांनी **दिनांक** १४/०३/ २०२४ रोजी दिलेल्या अर्जाप्रमाणे --------- येथील स.नं. ------ प्लॉट नंबर ------ आलेख नं.०४ न. भु. मा. क्रुजुना /सिटी स. क्र. ५०५ म. का. नं. ------ भागातील मिळकतीचे धारक / सहधारक **सोपान बाळाजी गुरमे** हे दिनांक २४/०६/१९९४ रोजी मृत्यु पावले व माझी आई **प्रयागबाई सोपान गुरमे** ही दिनांक १२/०६/२०२१२ रोजी मयत झाली आहे. त्यांच्या पश्चात वार म्हणून मी **व्यंकट सोपान गुरमे,** रा. अंधोरी ता. अहमदपूर वारस असल्याचे दिनांक १२/०३/२०२४ रोजी केलेल्या शपथपत्रात नमुद केले आहे. याच्याशिवाय दुसरे वारस असल्यास अथवा सदर मिळकती बाबत तक्रार आक्षेप असल्यास वरील तारखेपासून १५ दिवसाच्या आत या कार्यालयाकडे लेखी तक्रार कागदोपत्री पुराव्यानिशी सादर करावे. मुदतीनंतर आलेल्या तक्रारी अर्जाचा विचार केला जाणार नाही. व अर्जदार यांच्या अर्जाप्रमाणे सदर मिळकतीवर वारस शपथपत्रा अधारे नगर भुमापण अभिलेखात सदर मिळकतीवर नावाची नोंद घेण्यात येईल कळावे.

शिक्का

सही/-
उप अधिक्षक, भुमी अभिलेख,
अहमदपूर


**सुविचार**

एक चांगला शिक्षक यशाचे दार उघडून देऊ शकतो. मात्र त्यातून यशाच्या दिशेने जाण्यासाठी विद्यार्थ्याला स्वत: लाच चालावे लागते.

**दैनिक यशवंत नियमित वाचा**

# आंबेडकरी चळवळीचा परिवर्तनवादी प्रवाह, डॉ. नारायण कांबळे लिखित आंबेडकरी चळवळी, बदलते प्रवाह आणि आव्हाने या संदर्भाने

डॉ.नारायण कांबळे स्वामी विवेकानंद महाविद्यालय शिरूर (ताजबंद) जिल्हा लातूर येथे समाजशास्त्राचे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. डॉ.नारायण कांबळे एक अभ्यासू व फुले, शाहू आंबेडकर या विचारधारेचे लेखक आणि पाईक आहेत. संशोधन, ग्रंथ लेखन व प्रबोधन या कार्यात त्यांनी स्वतःला गुंतवून घेतले आहे. जेव्हा जेव्हा त्यांची भेट होते तेव्हा तेव्हा ते स्वतःच्या एका नव्या पुस्तकाबद्दल भरभरून बोलत असतात. पुरोगामी आणि परिवर्तनवादी चळवळीमध्ये काम करताना परिवर्तनाचा विचार त्यांनी स्वतः पासून सुरू केलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राजर्षी शाहू महाराज व्याख्यानमाला ते आपल्या मूळ हाळी हंडरगुळी या गावी वीस वर्षापासून चालवतात. तसेच लिहित्या आणि परिवर्तनवादी चळवळीत काम करणाऱ्यांच्या मित्रांसोबत ते स्पष्टपणे कायम सोबत असतात.त्यांचा मित्र परिवार ही सर्वसमावेशक आहे.

त्यांनी आपल्या लेखनाची सुरुवात मराजर्षी शाहू संघर्ष पर्वफ्फमहात्मा फुले यांची धर्मचिकित्साफ, या ग्रंथापासून केलेली आहे. यानंतर मआरक्षण सत्य व विपर्यासफ, मउच्च शिक्षणापुढील आव्ह-ानेफ,फ दलित चळवळीच्या दिशा एक चिंतनफ मडॉ बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिताफअशा २७ ग्रंथाचे लेखन केले आहे. या बरोबरच विविध संशोधन पत्रिकेत त्यांनी राष्ट्रीय पातळीवर ६० च्या वर शोधनिबंध प्रकाशित आहेत.अनेक वर्तमान पत्रातून ते सातत्याने लेखन करतात. समाजशास्त्राच्या अनेक परिषदा मधून ते साधन व्यक्ती म्हणून मार्गदर्शक राहिलेले आहेत. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणूनही काम केले आहे. सध्या ते विद्यापीठाच्या विद्या परिषदेवर सदस्य म्हणून कार्यरत आ-हेत. २०१९ यावर्षी स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाने आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. तसेच त्यांच्या अनेक ग्रंथांनाही पुरस्कार मिळा-लेले आहेत.

हे सर्व सांगण्याचे कारण म्हणजे डॉ. नारायण कांबळे यांचा नुकताच आंबेडकरी चळवळी बदलते प्रवाह आणि आव्हाने हा ग्रंथ प्रकाशित झाला आहे. या ग्रंथाचे संपादन त्यांनी अभ्यासपूर्वक आणि जाणीवपूर्वक केलेले दिसते. हा ग्रंथ म्हणजे डॉ.आंबेडकरांच्या नंतर ज्या आंबेडकरवादी चळवळी उभ्या राहिल्या, त्या चळवळीचा एक लेख-ाजोखाच यामध्ये आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेले अनेक परिवर्तनाचे लढे हे मानवी समाजाच्या उत्थानासाठी अत्यंत महत्त्वाचे होते. त्यांनी भारतीय समाज व्यवस्था जी की धर्माच्या सनातनी परंपरेवर आधारलेली होती ती बदलून समता, बंधुता, सामाजिक न्यायाच्या मूल्यतत्त्वावर निर्माण केली. हा लढा पुढे घेऊन जाण्यासाठी सर्व पुरोगामी चळवळीने एक होणे आवश्यक असताना बाबासाहेबांच्या नंतर असे झालेले दिसत नाही. दलित आणि दलितेतर, दलित आणि बहुजन समाजामध्ये आंबेडकरांना हवा असलेला समन्वय निर्माण झा-लेला नाही. राजकारणाचा महामार्ग हा सामाजिक प्रगती व परिवर्तनातून जा-तो, हे आजच्या राज्यकर्त्यांनी लक्षात घेतलेले दिसत नाही. यामध्ये दलित समाजातील राज्यकर्तेही येतात. अशी सडेतोड आणि निप:क्षपाती मांडणी डॉ. नारायण कांबळे संपादकीय भूमिकेत करतात. हा ग्रंथ म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने राजकारण, समाजकारण आणि परिवर्तनाचे लढे देऊ इच्छिणाऱ्या सर्व विद्वजनांनी वाचणे आवश्यक आहे. आपल्याच समाजातील एक अभ्यासू प्राध्यापक तळमळीने सत्य जाणून समाजापुढे आणि चळवळकर्त्यांपुढे विचार ठेवतो आहे. हे सर्व राज्यकर्त्यांनी नीटपणे समजून घेतले पाहिजे. आपले परिवर्तनाचे लढे आणि सामाजिक सुधारणा याला अलीकडे बरेच पायबंद घालण्यात येत आहेत. हे पायबंद म्हणजे पुन्हा एकदा जाती-धर्माच्या विषमतेत समाजाला बुडवायचे आहे.यासाठी राजकीय आणि तात्विक मतभेद थोडेसे बाजूला सारून समविचारी मंडळींनी एक झाले पाहिजे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित अस-लेला समाज आणि देश आपण घडवला पाहिजे. मला वाटतं या पुस्तकाच्या पाठीमागे हीच मुख्य प्रेरणा आहे.




आजचे राजकारण हे एवढे एकांगी आणि एकसूरी आणि एक व्यक्ती प्रधान झाले आहे की त्याला तोड नाही. लोकशाही प्रधान देशात व्यक्तिप्रधान राजकारण कधीही देशाला पुढे घेऊन जाऊ शकणार ना-हीत. हे सत्य डॉ. बाबासाहेबांना माहिती हो-ते, म्हणूनच तत्कालीन सर्व नेत्यांनी लोकशाही स्वीकारली आहे.

या ग्रंथात आंबेडकरी चळवळीच्या अनुषंगाने २८ लेख आहेत.ॲड. प्रकाश आंबेडकर यांचा वैचारिक चळवळीत काम करणाऱ्या सर्वांनी बाबासाहेबांचे विचार स्वीकारून स्वार्थाच्या तडजोडी बंद केल्या पाहिजेत. याशिवाय आंबेडकरी समाजाच्या उत्थानाचा लढा पुढे जाण-ार नाही. अनेक पक्षात राहून काम करण्यापेक्षा पक्षभेद विसरून आंबेडकरी विचाराच्या पक्षाने काम करणे आवश्यक आहे. हे ते स्पष्टपणे सांगतात. डॉ. जनार्दन वाघमारे यांचा परिवर्तनवादी चळवळीत विचारवंतांची भूमिका हा लेख म्हणजे विचारवंतांच्या कार्याची एक दिशा आहे. याबरोबरच दलित पँथर, भारीप पक्ष या पक्षातील नेत्यांची भूमिका व अभ्यासक, विचारवंतांची भूमिका आणि दलित सामाजिक कार्यकर्त्यांची भूमिका या अत्यंत महत्त्वाच्या आहेत. या सर्वच लेखकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नंतर दलित चळवळीत फाटाफूट व वैचारिक मतभेदात रुपांतर झाले.यामुळे दलित समाजाचे फार मोठे नुकसान झाले आहे. या ग्रंथातील लेखकांची यादी जरी पाहिली तर या ग्रंथाचे महत्त्व आपल्या सर्वांच्या लक्षात येते. संपादन ग्रंथ संपादित करताना संपादकांची वैचारिक भूमिका फार महत्त्वाची असते.ज्या विषयाने संपादन करावयाचे आहे त्याचा अभ्यास, चिंतन संपादक करतो.म्हणून या संपादन ग्रंथांचे संपादकीय लेखन खुद्द डॉ. नारायण कांबळे यांनीच केले आहे. ते औचित्यपूर्णही वाटते. चळवळीचे आकलन, चळवळीची व्याप्ती, स्वरूप व सद्यस्थिती या विषयी संपादकाने विचार केलेला असतो.म्हणून संपादकीय लेखन संपादकानेच करणे महत्त्वाचे असते.या ग्रंथाला प्रस्तावनाही नाही ते बरे आहे. संपादकीय लेखन व पहिला लेख म२१ व्या शतकातील बदलते प्रवाह आणि आंबेडकर चळवळी समोरील आव्हानेफ या दोन लेखातून लेखकाने या संपादनाची भूमिका सविस्तरपणे विशद केली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नंतर सर्व दलित चळवळी समोर समायोजन, संघटन, व्यापक राजकीय जाणिवांचा अभाव परिवर्तन प्रक्रियेच्या स्थितीगतीच्या जाणिवेचा अभाव अशी काही आव्हाने आज आंबेडकरी चळ-वळी समोर आहेत. आरक्षणाचा विचार आणि दलित बांधवावर झालेल्या अन्यायाचा प्रतिकार या दोन मुद्द्यात दलित चळवळ केंद्रित होऊन दलित समाजाचे मूलभूत प्रश्न व विचार चळवळीपासून दूर गेला. तसेच दलित चळवळी व पक्षाने सवर्ण समाजातील समाजाला आपल्या चळवळीकडे व पक्षाकडे वैचारिक तत्त्वावर आकर्षित केले नाही. अशी वस्तुस्थिती सांगणारी मांडणी प्रा. डॉ. नारायण कांबळे या लेखांमधून करतात. हे सर्वच लेख म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नंतर दलित चळवळींची स्थिती गती समजून घेण्याचा एक भाग आहे. तर दु-सरा भाग म्हणजे दलित चळवळीमधील भेदाभेद व संघर्ष त्यागून दलितांच्या अखंड कल्याणसाठी एक होणे आवश्यक आहे.दलित चळवळ आणि दलित पक्ष हे केवळ दलितांचे म्हणून ओळखले जातात. त्यापेक्षा ते पक्ष व चळवळ समग्र समाजाचे म्हणून ओळखणे जावे हा प्रवास त्यांच्याकडून होणे अपेक्षित आहे. हा प्रवास ज्या दिवशी होईल त्या दिवशी डॉ. आंबेडकरांचा विचार यशस्वी झाला असेच म्हणावे लागेल. या संपादन ग्रंथातील लेखक आणि त्यांनी लिहिलेले लेख प्रचंड अभ्यासातून, चिं-तनातून आणि एका भूमिकेतून लिहिलेले आहेत. या भूमिकेला वास्तवाचे भान आहे, तसेच पुढील जाणीवांचे ही भान आहे. सर्व लेखक यांची तळमळ दलित समाजाच्या उन्नतीत दडलेली आहे. डॉ.नारायण कांबळे सरांच्या पुढील लेखनासाठी खूप खूप शुभेच्छा!..

**प्रा. डॉ. जयद्रथ जाधव,**
प्रमुख, मराठी विभाग,
छत्रपती शिवाजी महाविद्यालय,
रेणापुर, जिल्हा लातूर

## कबीरवाणी

**अपानपौ न सराहिये,**
**और न काहीये रंक**
**ना जानो किस बिरख**
**तली, कुडा होई करंक**

**भावार्थ :** संत कबीर म्हणतात कि, मानव हा स्वतःचे बडप्पन व खोटी स्तुती यामध्ये स्वतः ला धन्य समजत असतो, खुश होत असतो, मात्र स्वतःची खोटी स्तुती करून अहंकार करणे आणि इतरांना तुच्छ समजणे या दोन्ही गोष्टी खोट्या अभिमानाची चिन्हे आहेत. आणि या खोट्या अभिमानामध्ये मानव जीवनभर जगत असतो.

यामुळे तो हे शरीर नाशवंत आणि तुच्छ आहे हे विसरुन जातो आणि अहंकारी जीवन जगतो. मात्र हे शरीर हाडांचा ढीग बनून कोणत्या उकिरड्यावर टाकले जाईल हे अज्ञान आणि माया यांमध्ये गुरफटलेल्या माणसाला माहीतच नसते.

**डॉ. कारामुंगीकर बालाजी**
**मो. ९८२३११२९०७**

यशवंत
धाराशिव जिल्हा
गुरूवार दि. २१ मार्च २०२४

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

## राष्ट्रवादी काँग्रेस महिला व युवती पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर

धाराशिव दि.२० (प्रतिनिधी) – राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या महिला व युवती पदाधिकाऱ्यांच्या निवडी दि.२० मार्च रोजी करण्यात आल्या.

दहा शिव शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात जिल्हाध्यक्ष महेंद्र धुरगुडे यांच्या हस्ते नूतन महिला पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी युवती काँग्रेसच्या धाराशिव शहराध्यक्षपदी स्वाती डोंगरे तर शहर उपाध्यक्षपदी हसीना पटेल तसेच सचिवपदी लैला शेख तसेच सहसचिवपदी सुलताना शेख यांची नियुक्ती करण्यात आली. जिल्हा कार्याध्यक्ष समियोद्दीन मशायक, धाराशिव तालुकाध्यक्ष प्रशांत फंड, महिला जिल्हा कार्याध्यक्ष अप्सरा पठाण, माजी सैनिक विभाग जिल्हाध्यक्ष मच्छिंद्र क्षीरसागर, सामाजिक न्याय विभाग जिल्हाध्यक्ष अतुल जगताप, आदिवासी सेल जिल्हाध्यक्ष नानासाहेब पवार, विद्यार्थी जिल्हा कार्याध्यक्ष प्रतीक माने, धाराशिव महिला शहराध्यक्ष सुलोचना जाधव, धाराशिव तालुका कार्याध्यक्ष रुक्मिणी कुंभार, अल्पसंख्यांक शहराध्यक्ष अमिना शेख, तालुका उपाध्यक्ष उषा लगाडे, सामाजिक

न्याय जिल्हा सरचिटणीस राजाभाऊ जानराव, अल्पसंख्यांक शहराध्यक्ष अरफात काजी, केशेगाव जि.प गट प्रमुख लिंबराज लोखंडे, बिस्मिल्ला शेख, मदिना शेख, जरीना मुलानी, रशिदा शेख, अंजुम शेख, फर्जना शहा, सायरा शेख, सुरेखा चव्हाण आदी उपस्थित होते.

# महायुतीची माझ्या विरोधात उमेदवार देण्यास दमछाक - खा. राजेनिंबाळकर

धाराशिव दि.२० (प्रतिनिधी) – राज्यातील महायुतीने आपल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द केली आहे. मात्र धाराशिव लोकसभा मतदार संघात महायुतीला सक्षम असा उमेदवार शोधताना दमछाक होत आहे. यावरुन मी कार्यक्षम आहे की नाही ? हे सिध्द होते असा दावा खा ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी केला आहे.

महाविकास आघाडी सरकारच्या काळात जिल्ह्यामध्ये वैद्यकीय महाविद्यालयासाठी पाठपुरावा करुन मंजुर करुन घेतले. तसेच तुळजापुर-धाराशिव रेल्वे मार्गाचे २०१४ मध्ये घोषणा करुनही रखडलेले काम मार्गी लावून भुसंपादन प्रक्रीया चालू केली आहे. अशाच प्रकारे सोलापुर-उमरगा महामार्गाचे रखडलेले काम देखील अंदोलनात्मक मार्गाने टोल वसुली बंद करुन शिवसेना स्टाईलने चालू करण्यास भाग पाडल्याचे त्यांनी सांगितले. तसेच शेतकऱ्यांच्या दैनंदिन अडचणींचा महत्वाचा मुद्दा म्हणजे महावितरणच्या सुधारीत विद्युत वितरण होण्याच्या धोरणात्मक एकूण जिल्ह्यातील १३०३ कोटी रुपये आराखड्याच्या मंजुरीने विद्युत पुरवठ्यातील येणाऱ्या अडचणी भविष्यात कमी होतील असा विश्वास व्यक्त केला.

तसेच यासाठी वैयक्तीक पाठपुरावा करुन सुधारीत आराखडा मंजुर करुन घेतला असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर मतदार संघातील प्रत्येक अडचणीत नेहमी नागरीकांच्या समस्यांना प्रधान्य देवून त्या सोडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. परंतू आभासी फसव्या विकासाची स्वप्ने न दाखवता, प्रामाणिकपणे शाश्वत व धोरणात्मक धोरणे मतदार संघातील जनतेसाठी आवश्यक विकासात्मक कार्य नेहमीच चालू असल्याचे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे जनतेचा मिळत असलेला प्रचंड प्रतिसादामुळेच विरोधकांना अजूनही माझ्या विरोधात सक्षम असा उमेदवार देता आला नसल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. खा.राजेनिंबाळकर यांनी उमरगा तालुक्यातील कोथळी, कंटेकुर, मुरळी, औराद येथील जनसंपर्क कार्यक्रम दरम्यान जनतेशी संवाद साधला. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष केशव उर्फ बाबा पाटील, उपजिल्हाप्रमुख बसवराज व्हरनाळे, पंसचे माजी सदस्य शिरीष पाटील, शेतकरी सेनेचे जिल्हाप्रमुख विजयकुमार नागने, जिल्हा संघटक दिपक जवळगे, पंचायत समितीचे माजी सदस्य विलास व्हटकर, चेतन पाटील, माणिक बुआ, महेश चौगुले, ऋषीकेश कदम, निळकंठ स्वामी, श्रीमंत भुरे, अक्षय कुलकर्णी, नसीम शेख, रवी जमादार, विलू भोसले,

चेतन पाटील आदींसह पदाधिकारी नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## फार्मसी क्षेत्रांतील करियर व व्यवसाय संधीबाबत कार्यशाळेत तज्ज्ञांनी केले मार्गदर्शन

धाराशिव दि.२० (प्रतिनिधी) – डी. फार्मसी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी औषध निर्माण शास्त्र क्षेत्रातील करियर व व्यवसाय संधी याबाबत एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विविध तज्ज्ञांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

धाराशिव येथील डॉ. वेदप्रकाश पाटील शैक्षणिक संकुलात धनेश्वरी शिक्षण समूहाचे अध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एस.बी.एन.एम. कॉलेज ऑफ फार्मसी व आर.पी. कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ग्लोबल फार्मा एकॅडेमीचे संस्थापक अमित माने व एम्पिम-एक्स इंडिया प्रा. लि. कंपनीचे संचालक ऍड. अमोल पाटील, एस.बी.एन.एम. कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. सुरज ननवरे, आर.पी. कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. गाझी शेख व डी. फार्मसीचे विभाग प्रमुख प्रा. सुबोध कांबळे आदी उपस्थित होते. माने यांनी विद्यार्थ्यांना फार्मसी इंडस्ट्रीमध्ये करियर संदर्भातील विविध उपलब्ध संधी, त्यासाठी आवश्यक विविध कौशल्य आधारित कोर्सेस याबाबत माहिती सांगितली. तर विद्यार्थ्यांनी नोकरीच्या संधी कशा शोधल्या जातात ? त्यासाठी स्वतःचा बायोडाटा कशा पध्दतीने बनवावा ? मुलाखतीची तयारी कशा प्रकारे करावी ? याबाबत मार्गदर्शन केले. यासाठी विद्यार्थ्यांनी स्वतःमध्ये आत्मविश्वास वाढवून इंडस्ट्री क्षेत्रात पदार्पण केल्यास यश संपादन करता येईल, असे आवाहन त्यांनी केले. तर ऍड पाटील यांनी विद्यार्थ्यांना औषध निर्मिती क्षेत्रात भारत देश अग्रेसर असून भविष्यात फार्मसी मार्केटिंग व औषध निर्यात क्षेत्रात उपलब्ध विविध संधी तसेच औषध आयात-निर्यात व्यवसाय सुरु करण्यासाठी आवश्यक विविध तांत्रिक प्रक्रिया याबाबत स्व-अनुभव कथन करीत मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांनी व्यवसाय क्षेत्राची निवड केल्यास जिद्द, चिकाटी व मेहनत या जोरावर नक्कीच यश प्राप्त होईल. त्यामुळे विद्यार्थ्यांनी व्यवसाय क्षेत्र निवडून स्वतःचे भविष्य घडवावे व पालकांचे स्वप्न पूर्ण करावे असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अमोल मोरे यांनी तर सूत्रसंचालन प्रा. सिद्धि बसाटे व प्रा. अमर माने यांनी तसेच आभार विभाग प्रमुख प्रा. सुबोध कांबळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. नितिन सातपुते, प्रा. शीतल केदार, प्रा. वैभव रेडे, प्रा. रितिका पाटील यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राष्ट्रवादी शरदचंद्र पवार कॉग्रेसच्या महिला पदाधिकाऱ्यांच्या निवडी

धाराशिव दि.२० (प्रतिनिधी) – राष्ट्रवादी शरदचंद्र पवार काँग्रेसच्या कार्यकर्त्यांची सौ. मनिषा पाटील यांच्या संपर्क कार्यालयात आढावा बैठक घेण्यात येऊन या बैठकीमध्ये नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडी दि.२० मार्च रोजी करण्यात आल्या.

धाराशिव शहरातील मनिषा राखुंडे-पाटील यांच्या संपर्क कार्यालयात महिला कार्यकर्त्यांची आढावा बैठक जिल्हाध्यक्षा मनिषा राखुंडे – पाटील व जिल्हा उपाध्यक्षा शोभा मस्के यांच्या उपस्थितीत घेण्यात आली. यावेळी राखुंडे पाटील म्हणाल्या की, पक्षप्रमुख खासदार शरद पवार यांनी महिलांना राजकीयदृष्ट्या सक्षम करण्यासाठी पंचायत राज म्हणजेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षण देऊन महिलांना राज्य कारभार करण्याची संधी उपलब्ध करून केली. तर खा सुप्रियाताई सुळे यांनी महिला बचत गटाच्या माध्यमातून महिलांना त्यांचे जाळे निर्माण करण्यासाठी मदत करून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे अतिशय महत्त्वाचे काम केल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी उमरगा तालुकाध्यक्षपदी संगीता सलगर यांची तर तुळजापूर तालुकाध्यक्षपदी मनिषा काशिद यांची तसेच कळंब तालुकाध्यक्षपदी सलमा सौदागर

यांची तर उमरगा तालुका उपाध्यक्षपदी यशोदा पवार व नागिनी कांबळे यांची तसेच तुळजापूर तालुका उपाध्यक्षपदी रेणुका सुरवसे यांची तर कळंब तालुका उपाध्यक्षपदी सुमती तोंरसले यांची तसेच उमरगा शहराध्यक्षपदी राजश्री सुरवसे यांची तसेच दिपाली कुलकर्णी व उमरगा तालुका कार्याध्यक्षपदी अमिना मुजावर यांची तर शहर उपाध्यक्षपदी संगीता मोरे यांची निवड करण्यात आली. या पदाधिकाऱ्यांच्या निवडीनंतर पक्षाच्या जिल्हा कार्यालयात जिल्हाध्यक्ष संजय पाटील दुधगावकर, महिला जिल्हाध्यक्ष मनिषा राखुंडे – पाटील, युवक जिल्हाध्यक्ष शेखर घोडके यांनी सत्कार केला.

## विद्याधन एकॅडमीच्या यशस्वी विद्यार्थ्यांचा दुधगावकर यांनी केला सत्कार

धाराशिव दि.२० (प्रतिनिधी) – येथील विद्याधन एकॅडमीच्या ६ विद्यार्थ्यांची सैनिक स्कूलसाठी निवड झाली आहे. त्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष संजय पाटील दुधगावकर यांच्या हस्ते दि.१९ मार्च रोजी पुष्पहार, शाल व श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला.

यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये अदिती गोडसे, शाक्य सरवदे, सागर घोडके, वैभवी केंद्रे, सुमेध सरवदे व साईकृष्ण माने यांचा समावेश आहे. यावेळी दुधगावकर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांसह एकॅडमीचे प्रमुख स्पप्नील पाटील व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांना शुभेच्छा देत यापुढील काळात सर्व शैक्षणिक परिक्षेमध्ये उत्तुंग यश प्राप्त करण्यासाठी जिद्दीने अभ्यास करावा असे आवाहन केले. यावेळी अनिल जाधव, पांडूरंग मते, दादासाहेब घोडके यांच्यासह विद्यार्थी व पालक आदींची उपस्थित होते. तसेच तडवळा येथील जिल्हा परिषद शाळेतील ५० विद्यार्थ्यांचे सैनिक स्कूल शाळेत पास झाल्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक रहिमान सय्यद, जगन्नाथ धायगुडे, बाळासाहेब जमाले, आंबिका कोळी, शहाजी पुरी, रामकृष्ण ढवळे यांचे देखील अभिनंदन केले.

## चवदार तळे सत्याग्रहनिमित्त समता सैनिक दलाच्या प्रशिक्षण शिबिरास प्रतिसाद

नळदुर्ग दि.२० (प्रतिनिधी) – महाड चवदार तळे सत्याग्रह दिनानिमित्त भारतीय बौद्ध महासभेच्यावतीने समता सैनिक दलाचे एक दिवसीय प्रशिक्षण शिबिर दि.२० मार्च रोजी आयोजित करण्यात आले होते.

२० मार्च हा ९७ वा महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह हा बौद्ध शोषित पीडित बहुजन वर्गातील नागरिकांसाठी क्रांतीकारी दिवस म्हणून संपूर्ण विश्वात गणला जातो. प्रथम डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पूज्य भन्ते सुमंगल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी समता सैनिक दलाच्या सर्व सैनिकांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांना मानवंदना दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरचिटणीस किरण कांबळे होते. यावेळी फुले शाहु आंबेडकर चळवळीतील साहित्यिक प्रा किरण सगर यांचा त्यांच्या सेवानिवृत्तबद्दल सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास जिल्हा कोषाध्यक्षा राजश्रीताई कदम, पर्यटन विभाग उपाध्यक्ष विश्वास पांडागळे,

जिल्हा कार्यालयीन सचिव दादासाहेब बनसोडे, लोहारा उपाध्यक्ष सुनील भालेराव, दिलीप गायकवाड, जालिंदर कांबळे, ब्रम्हाणंद गायकवाड यांच्यासह कदेर, औराद, एकुरगा, तूगाव, तुरोरी, बडूर, आलूर व वागदरी या गावातील महिला व पुरुषांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला. हे प्रशिक्षण पुणे येथील भारतीय बौद्ध महासभेचे मेजर केंद्रीय शिक्षक ऍड अनिल सतीश कांबळे दिले. त्यांना सहाय्यक म्हणून राजरत्न बनसोडे यांच्यासह सैनिक शिबिरासाठी उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक तालुकाध्यक्ष संतोष सुरवसे यांनी तर सूत्रसंचालन शिवानंद भंडारे यांनी व आभार तालुका उपाध्यक्ष राजेंद्र सुर्यवंशी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी आंनद कांबळे, अविनाश भालेराव, रुपेश कांबळे, उध्दव गायकवाड, जीवन सुर्यवंशी, महेश सुर्यवंशी, बलभीम गायकवाड, अरुणा सुर्यवंशी, लताताई कोल्हे, विद्याताई कांबळे यांनी परिश्रम घेतले. यावेळी उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निवडणूक काळात आदर्श आचार संहितेचे सर्वांनीच पालन करावे - डॉ. ओंबासे

धाराशिव दि.२० (प्रतिनिधी) – भारत निवडणूक आयोगाने १६ मार्च रोजी लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम घोषित केला आहे. तेंव्हापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आली आहे. जिल्ह्यातील लोकसभा निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टिकोणातून निवडणूक प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांवर पक्ष प्रचाराचे कापडी फलक, झेंडे लावणे आदी बाबींसाठी काही बंधने घातली आहेत. त्यामुळे निवडणूक काळात आदर्श आचारसंहितेचे सर्वांनीच पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ सचिन ओंबासे यांनी केले आहे.

जिल्ह्यात फिरत्या वाहनांवर पक्ष प्रचाराचा झेंडा हा वाहनाच्या डाव्या बाजूला विंड स्क्रिन ग्लॉसच्या पुढे राहणार नाही. तसेच तो त्या वाहनाच्या टपापासून २ फुट उंचीपेक्षा जास्त राहणार नाही.



तसेच मोटारसायकलवर तो दीडफुटापेक्षा जास्त आकाराचा असणार नाही. प्रचाराच्या फिरत्या वाहनांवर कापडी फलक वाहन चालकाच्या आसनामागे, वाहनाच्या डाव्या व उजव्या बाजूने लावण्यात यावा, इतर कोणत्याही बाजूस तो लावता येणार नाही. फिरत्या वाहनांवर लावावयाचा पक्ष प्रचाराचा झेंडा किंवा कापडी फलक संबंधित पक्षाचे जिल्हाध्यक्ष, उमेदवार व उमेदवाराचे निवडणूक प्रतिनिधी यांच्या वाहनाव्यतिरिक्त इतर कोणत्याही वाहनांवर लावता येणार नसल्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी डॉ.सचिन ओंबासे यांनी काढले आहेत. हे आदेश ६ जूनपर्यंत अंमलात राहतील.

### निवडणूक नमुना मतपत्रिका छपाईस निर्बंध

लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीची संपूर्ण पक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टिकोनातून राजकीय पक्षांनी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधीने किंवा त्यांच्या हितचिंतकाने मुद्रणालयाच्या मालकाने व इतर सर्व माध्यमांद्वारे छपाई करणाऱ्या मालकाने तसेच प्रकाशकाने नमुना मतपत्रिका छापताना इतर उमेदवाराचे नाव व त्यांना नेमून देण्यात आलेले चिन्ह वापरणे, नमुना मतपत्रिकेसाठी आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे कागद वापरणे, आयोगाने निश्चित केलेल्या कागदाच्या आकारामध्ये नमुना मतपत्रिका छापणे आदी बाबींवर निर्बंध घालण्यात येत आहेत. नमुना पत्रिका छपाईस निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत म्हणजेच ६ जूनपर्यंत संपूर्ण जिल्ह्यात निर्बंध घालण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत.

### झेंडे व भित्तीपत्रके लावण्यास निर्बंध

लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीची संपूर्ण प्रक्रीया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोणातून राजकीय पक्षांनी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या हितचिंतकांनी निवडणूकीच्या प्रचारासाठी झेंड्याच्या काठ्या उभारणे, कापडी फलक लावणे, भित्तीपत्रक लावणे, घोषणा लिहिणे इत्यादीकरीता कोणत्याही व्यक्तीची जागा, इमारत, आवार किंवा भिंत आदींवर संबंधित मालकाच्या परवानगीशिवाय व संबंधित परवाना प्राधिकरणाच्या परवानगीशिवाय वापर करण्यास निर्बंध घालण्यात आले आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी डॉ.सचिन ओंबासे यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये हे आदेश दिले आहे. निवडणूकीच्या प्रचारासाठी कोणत्याही व्यक्तीगत जागा, इमारत, आवार किंवा भिंत इत्यादींचा संबंधित जागा मालकाच्या परवागीशिवाय व संबंधित परवाना देणाऱ्या प्राधिकरणाच्या परवागीशिवाय वापर करण्यास ६ जूनपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहे.

### जात, धर्म, भाषावार शिबिरांच्या आयोजनास निर्बंध

लोकसभा निवडणूकीची संपूर्ण प्रक्रीया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून जिल्ह्यात कसल्याही प्रकारचे जात, भाषा, धार्मिक शिबीरांचे, मेळाव्यांचे आयोजन करण्यावर निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत म्हणजेच ६ जूनपर्यंत निर्बंध घालण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ.सचिन ओंबासे यांनी दिले आहेत.

### सार्वजनिक इमारतीच्या ठिकाणी, सार्वजनिक रस्त्यावर अडथळ्यास निर्बंध

धाराशिव दि.२० (प्रतिनिधी) – भारत निवडणूक आयोगाने १६ मार्च रोजी लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम घोषित केला आहे. तेंव्हापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आल्याने जिल्हयातील लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीची संपूर्ण प्रक्रीया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोणातून राजकीय पक्षांनी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या हितचिंतकाने सार्वजनिक इमारतीच्या ठिकाणी, सार्वजनिक रस्त्यावर निवडणूकीच्या संबंधी पोस्टर्स, बॅनर्स, पॉम्पलेटस्, कटआऊटस्, होर्डिंग्ज, कमानी लावणे या व इतर बाबींमुळे रहदारीस अडथळा निर्माण होऊ शकेल किंवा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे त्यावर ६ जूनपर्यंत जिल्ह्यात निर्बंध घालण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ.सचिन ओंबासे यांनी दिले आहेत.

### कार्यालये, विश्रामगृहे परिसरात मिरवणूक काढण्यास निर्बंध

लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीची संपूर्ण प्रक्रीया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून कार्यालये, विश्रामगृहे याठिकाणी कोणत्याही प्रकारची मिरवणूक, मोर्चा काढणे, आंदोलन करणे, निदर्शने करणे, उपोषण करणे तसेच कोणत्याही प्रकारची घोषणा देणे, वाद्य वाजविणे किंवा गाणे म्हणणे तसेच कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करण्यास ६ जूनपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहे. याबाबत डॉ ओंबासे यांनी आदेश काढले आहेत.

### धार्मिक स्थळांसह सार्वजनिक ठिकाणी पक्ष कार्यालये स्थापणन्यास निर्बंध

लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीची संपूर्ण प्रक्रीया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोणातून जिल्हयातील धार्मिक स्थळे, रुग्णालये, शैक्षणिक संस्था व सार्वजनिक ठिकाणांच्या जवळपास तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यावर ६ जूनपर्यंत निर्बंध घालण्याचे आदेश डॉ. ओंबासे यांनी दिले आहेत.

# संपादकीय

## नव्या मित्राची गरज का?

२००६ मध्ये राज ठाकरे शिवसेनेबाहेर पडले, त्यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची स्थापना केली. पुढे पक्षाचा ध्वज बदलला; पण राजकीय पक्ष म्हणून जो सूर सापडणे अपेक्षित होते ते झाले नाही.

शिवसेनेत फूट पाडून भाजपने राज्यात युतीचे सरकार आणले. तेवढ्यावर न थांबता राष्ट्रवादी काँग्रेस फोडून युतीचे महायुती'मध्ये रुपांतर केले. एवढे होऊन देखील महाराष्ट्रात किती यश मिळेल, याबद्दल भाजपला वाटत असलेली भीती कायम आहे. महायुतीत मनसेला घेऊन नवा भिडू जोडण्याचा खटाटोप त्यातूनच दिसतो. गेल्या लोकसभा निवडणुकीत राज्यातील ४८ पैकी भाजपने २३ जागा जिंकल्या आणि तेव्हाचा मित्र पक्ष असलेल्या शिवसेनेने १८ जागांवर विजय मिळवला. देशपातळीवर चारसौ पार' अशी गर्जना करण्यात आली, तर महाराष्ट्रात अब की बार ४५ पार' ही घोषणा आहे. आतापर्यंतच्या कल चाचण्यांमध्ये राज्यात भाजपला सर्वाधिक जागा मिळतील असा अंदाज व्यक्त करण्यात आला खरा, मात्र ४५ या लक्ष्यापासून तो कितीतरी दूर आहे! फुटीनंतर एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्याकडे लोकप्रतिनिधींची संख्या मोठी असली तरी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना आणि शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या स्थानाला जनमानसात धक्का लागलेला नाही, असाच निष्कर्ष काढावा लागेल. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाची सुरु असलेली धावपळ समजून घेता येईल. केंद्रात बहुमत मिळविण्यासाठी भाजपला एकेक जागा महत्त्वाची आहे. पंतप्रधानांचे दक्षिण दौरे धडाक्यात सुरु असले तरी तेथील राज्यांवर भिस्त ठेवावी, अशी स्थिती नाही. २०१९ च्या यशाची पुनरावृत्ती पश्चिम बंगालमध्ये होईल का, हे ठामपणे सांगणे अवघड आहे. कर्नाटकात काँग्रेसचे सरकार असल्याने तेथे लोकसभेला अनुकूल चित्र राहील, असे म्हणता येत नाही.

### ठाकरे विरुद्ध ठाकरे

अशावेळी भाजपची मदार महाराष्ट्रावर असून, त्यासाठी पंतप्रधान, केंद्रीय गृह मंत्री वारंवार दौर्यावर येत आहेत. मुख्य मंत्री शिंदे, उपमुख्य मंत्री अजित पवार यांच्या बेरजेतून यशाची निश्चिती व्हायला हवी होती, ती नाही यासाठीच आता राज ठाकरे यांना सोबत घेण्याच्या हालचाली वेगवान झाल्या. मुंबईच्या सहा जागांवर विजय मिळविण्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची मदत महत्त्वाची ठरेल, असे भाजपच्या वरिष्ठांना वाटते. त्याशिवाय ठाकरे विरुद्ध ठाकरे, ही व्यूहरचना देखील डोळ्यासमोर असावी. निवडणुकीतील यश, याच मुख्य आधारावर राजकीय पक्षांचे मूल्यमापन केले जाते. राज यांच्या सभांना मोठी गर्दी होते, मात्र सभांना मिळणारा प्रतिसाद मतांमध्ये बदलल्याचे दिसले नाही. २००६ मध्ये राज ठाकरे शिवसेनेबाहेर पडले, त्यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची स्थापना केली. पुढे पक्षाचा ध्वज बदलला; पण राजकीय पक्ष म्हणून जो सूर सापडणे अपेक्षित होते ते झाले नाही. बदलत्या भूमिकांमुळे मनसेच्या वाटचालीवर लागलेले प्रश्नचिन्ह अद्याप कायम आहे. राज्यात शिंदे – फडणवीस सरकार आल्यावर या दोघांबरोबर राज यांच्या भेटीगाठी वाढल्या होत्या. तेव्हापासून मनसे महायुतीत येणार ही चर्चा रंगली होतीच. राज ठाकरे यांनी अमित शहा यांची भेट घेतली आहे. आता महायुतीत मनसेच्या प्रवेशाची औपचारिकता बाकी आहे. महायुतीमधील तीन घटक पक्षांमध्ये आजघडीला सर्व आलबेल आहे, असे मानण्यासारखी स्थिती नाही. भाजपने २० जागांवर आधीच उमेदवार जाहीर केले आहेत. काही जागांवर किरकोळ मतभेद आहेत, असे तीनही पक्षांचे नेते सांगत असले तरी किरकोळ' तिढा सुटलेला नाही. राष्ट्रवादीचा एक गट महायुतीत आल्यावर शिंदे गटाची अस्वस्थता लपली नव्हती. मागील निवडणुकीत अखंड शिवसेनेने लढविलेल्या सर्व जागा एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला मिळणे अपेक्षित होते. त्यात राष्ट्रवादीच्या रुपाने वाटेकरी निर्माण झाला. आता मनसेचा प्रवेश होत आहे. सहकार्याच्या बदल्यात मुंबईतील एक जागा मनसेला दिली जाऊ शकेल; पण मनसेची साथ मिळाली तरी भाजपची अस्वस्थता संपणार का? हा प्रश्न राहतोच. तोडफोड, तत्वशून्य तडजोडी याची जनमानसात उमटलेली प्रतिक्रिया जागांचे लक्ष्य गाठण्यात अडथळा ठरु शकते. म्हणूनच निवडणूक आणि सत्तेसाठीच्या तडजोड मालिकेतील आणखी एक पाऊल, असे नव्या घडामोडींबद्दल म्हणावे लागेल.

**ज्यांच्या शोधामुळे जगाची जगण्याची दिशा बदलली असे जागतिक कीर्तीचे थोर शास्त्रज्ञ यांची नवीन अभ्यासू पिढीला माहिती व्हावी व त्याद्वारे प्रेरणा मिळावी या हेतूने संक्षिप्त स्वरुपात दरदिवशी किंवा सोईप्रमाणे एका शास्त्रज्ञांची माहिती आम्ही प्रकाशित करीत आहोत. यासंदर्भात आपली प्रतिक्रिया आपेक्षित आहे.**

– संपादक **यशवंत** लातूर

# डॉ. रेने लेनेक ४९



काळजाचे ठोके मोजणाऱ्या स्टेथॉस्कोपचा शोध लावणाऱ्या डॉ. रेने लेनेक यांचा जन्म सुमारे १७८० मधला. ते एक सुप्रसिद्ध डॉक्टर म्हणून फ्रान्समधील नेकर या नामांकित हॉस्पिटलमध्ये कार्यरत होते. अनेक रोग्यांची त्यांना जातीने शुश्रुषा व तपासणी करावी लागे. त्यावेळी हृदयरोग तपासणी करताना रोग्याच्या छातीला कान लावून ठोके ऐकले जात असत. एकदा एक श्रीमंत बाई छातीच्या विकाराने त्रस्त होत्या. पण त्यांची तपासणी करायची कशी ? या सततच्या विचारात असलेल्या डॉ. लेनेकनी एके दिवशी दोन मुलांचा चाललेला खेळ लक्षपूर्वक पाहिला.

एका ओंडक्याच्या दोन्ही टोकाला दोन मुले कसला तरी खेळ खेळत होती. ओंडक्याच्या एका टोकाला एक मुलगा वारंवार ठोकत होता आणि दुसऱ्या टोकाला दुसरा मुलगा ते ठोके ऐकण्यात गढून जाऊन मध्येच आनंद व्यक्त करीत होता. या मुलांच्या खेळण्यातूनच डॉक्टरांना स्टेथॉस्कोपची कल्पना सुचली असावी. घनपदार्थातून ध्वनी जात असताना तो मोठा होतो हे पदार्थविज्ञानाचे तत्त्व डॉ. लेनेक यांच्या लक्षात आले. ही कल्पना रोग्याच्या छातीची तपासणी करण्यास उपयोगी पडेल असे त्यांना वाटले. हॉस्पिटलमध्ये बसल्या बसल्या त्यांनी समोरच्या वर्तमानपत्राची एक लांबट गुंडाळी तयार केली व रोग्याच्या छातीला लावून छातीचे ठोके ऐकण्यास सुरुवात केली, ही वर्तमानपत्राची गुंडाळीच हृदयाचे ठोके ऐकू येणारी पहिली स्टेथॉस्कोप असावी, असे मानण्यात येते.अशा प्रकारे माणसाच्या काळजाचा प्रत्यक्ष आवाज ऐकणारा डॉ. लेनेक हा जगातील पहिला डॉक्टर होय. परंतु सुरुवातीला एका साध्या नळकांड्याने रोग्यांना तपासणारा हा डॉक्टर पाहून सर्वांना आश्चर्य व गंमतच वाटली. त्यांच्या ध्यानात या प्रयोगाचे महत्त्व लक्षात आले नाही. या यंत्राच्या शोधासाठी मात्र डॉ. लेनेक यांनी वर्षानुवर्षे हजारो रोग्यांची तपासणी करून अनेक आडाखे तयार केले. प्रत्येक रोग्याची छाती नळकांड्याने तपासून रोग्याच्या छातीतील वेगवेगळे फरक ऐकून त्या आवाजांची ते नीट नोंद ठेवीत असत. एक दिवस एका नव्या रोग्याच्या छातीचा आवाज त्यांना नीट ऐकू येईना. इतर डॉक्टरांचे म्हणणे होते की, त्या रोग्यास न्यूमोनियाने पछाडले आहे. डॉ. लेनेक यांनी आपल्या पूर्वज्ञानाच्या आधारावर त्या नवीन रोग्यास 'ऑम्पिएमा' झाला असावा, म्हणजेच छातीत पू साठून आवाज दबून गेला असावा असा निष्कर्ष काढला व योग्य उपचार केले. त्यामुळे रोगी बरा होऊन छातीतून नेहमीसारखी धडधड ऐकू येऊ लागली. स्टेथॉस्कोपच्या उपयुक्ततेची अशी प्रचीती आल्यामुळे इतरांनी त्यांचे अभिनंतन केले. या विषयाचा सतत अभ्यास करून लेनेकने आपल्या अनुभवजन्य टिपणांवर आधारित विस्तृत लेखन करून १८१९ मध्ये आपला प्रबंध प्रकाशित केला. नवीन सुधारणा घडवून आणलेले स्टेथॉस्कोपही त्यांनी विक्रीसाठी तयार ठेवले. अशाप्रकारे रोगपरीक्षेत स्टेथॉस्कोपला प्राधान्य देणारे डॉ. लेनेक इ.स. १८२६ मध्ये कालवश झाले.

# उपदेशकथा: थोडक्यात गोष्टी

हॅरॉल्ड मॅकमिलन इंग्लंडचे पंतप्रधान होते. एकेकाळी मुंबईला त्यांचा एकदा भारतीय विद्याभवनात गौरव करण्यात आला. त्यांनी भाषणात एक गोष्ट सांगितली होती. इंग्लंडच्या हाऊस ऑफ कॉमन्समध्ये प्रथा आहे की, कुणाही नवीन सदस्याचे पहिले भाषण (मेडन स्पीच) होईल तेव्हा खुद्द पंतप्रधानांनी उठून त्याला शाबासकी द्यावी आणि म्हणावे, 'थोरल्या पिटपासून (हा इंग्लंडचा पहिला पंतप्रधान) आजतागायत एवढं सुंदर भाषण कुणी केलं नव्हतं!' मॅकमिलन पुढे म्हणाले, 'मात्र, त्या सदस्याला बोलावून मी खासगीत सांगत असे की, पहिल्याच वा एकाच भाषणात एवढे मुद्दे कोंबू नयेत. सभासदानं एकच मुद्दा घेऊन विवरण करावं. मंत्र्यांनं दोन मुद्दे घेऊन, आणि तीन मुद्दे ही पंतप्रधानपदाची मिरास. तुमच्या प्रतिपादनाकडे सर्वांचं लक्ष वेधून घ्यायचे असेल तर लांबण न लावता एकच मुद्दा लावून धरा!'

कथा उपदेश : थोडक्यात बोला, विषयाला धरून बोला नि खाली बसा.

## सुविचार

दीर्घकाळ धुमसत राहण्यापेक्षा क्षणभरच का होईना प्रज्वलित होणे चांगले.

– महाभारत

## संस्कृत सुभाषित

**कारे नाठविशी कृपाळू देवासी ।**
**पोशितो जगासी एकलाचि।।**

**अर्थ** – संकुचित बुद्धी व स्वार्थ माणसाला खरे देत नाही. उदार मन आणि त्या दुसऱ्यासाठी काही करणे, झिजणे हाच आपल्या संस्कृतीचा स्थायीभाव आहे

# वक्त हर किसीका आता है



आता प्रत्येकालाच कोणतीही गोष्ट लवकरात लवकर कमी वेळात पाहिजे आहे. मग ती नौकरी असो की एखादे कोणतेही काम असो कमी मेहनतीमध्ये जास्त नफा कसे मिळवणार हे बघितल जातो. आता स्पर्धेचा युग आहे इथ प्रत्येकच व्यक्ती धावपळ करीत असतो. आज देशामध्ये खुप सुशिक्षित वर्ग निर्माण झाला आहे. सुशिक्षित असूनही नौकऱ्या नाही. नौकरी मिळवण्यासाठी आता अनेक विद्यार्थी धावपळ करीत आहेत. भरपूर मुल मुली स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करतांना दिसतात. काहींना यश मिळतो तर काहींना अनेक वर्ष अभ्यास करूनही अपयश येतांना दिसतो. काही विदयार्थी तर अपेक्षाच सोडून देतात आणि दुसऱ्या क्षेत्रात वळतात. आज अभ्यासाच्या नावाखाली मुल मुली पुणे, मुंबई सारख्या शहरात जात असतात. आई वडील ही मुलांनच्या भविष्यासाठी त्यांना महागाडी कोचिंग क्लास लाऊन देतात. असे पण काही विद्यार्थी आहेत जे अभ्यासाच्या नावाखाली आईवडिलांकडून पैसे मागुन मौज मजा करीत असतात. काही विद्यार्थी अनेक वर्षापासुन अभ्यास करूनही त्यांना यश मिळत नाही. आता त्यांना यश का मिळत नाही हे त्यांच्या मेहनतिवर व प्रत्येकाच्या महत्त्वकांक्षेवर अवलंबून आहे. माझ्या सोबत अभ्यासीकेमध्ये एक मुलगा आहे तो आता वयाच्या एकविसाव्या वर्षी एअर फोर्स मध्ये असिस्टंट मॅनेजर म्हणून त्याची निवड झाली. त्याच्या मनात अधिकारी व्हायची खूप जिद्द आहे. त्यासाठी तो खूप मेहेनतही घेतो. वयाच्या एकविसाव्या वर्षी नौकरी मिळवली आणि अधिकारी होण्याची जिद्द आपल्यासाठी प्रेरणादायी आहे.आपल्या मनात जिद्द असेल तर आपण कोणतेही काम करू शकतो. काहींना यश हे उशिरा मिळतो तर काहींना लवकर मिळत असतो.अनेक वर्षे अभ्यास करूनही सतत अपयश येतो हे बघुन काही विद्यार्थांच्या मनात नैराश्य निर्माण होतो. आणि अश्या वेळी आत्महत्या सारखे पाऊल उचलत असतात. जीवनात एखाद्या क्षेत्रात अपयश आले म्हणून असे टोकाचे पाऊल उचलणे चुकीचे आहे. ह्या एका चुकीच्या निर्णयामुळे आपल्या आईवडिलांना याचा काय परिणाम होईल याचा विचारही आपण करीत नाही.प्रत्येक आईवडिलांना वाटते की आपले मुल मुली नौकरीवर लागावे. आपल्याला बघुन ते जगत असतात. आपणच त्यांचे आधार असतो. आणि आपण जर असे टोकाचे पाऊल उचलले तर त्यांच्यावर खूप आघात होईल. जर नौकरी मिळाली नाही तरी आपण कोणताही व्यवसाय करू शकतो. पर्याय म्हणून खूप संधी आपल्या जवळ असतात . परंतु एकदा गेलेले प्राण परत कधीच येत नाही. म्हणून आपल्या मनात कधीही नकारात्मक विचार आणू नये. नकारात्मक विचाराने माणसाची विचार करण्याची क्षमता कमजोर होतो. हिम्मत ठेवायला शिका, कारण जिवनात कधी कुणाची दिशा बदलायला वेळ लागत नाही. आणि कुणाची दशा होईल हेही सांगता येत नाही. म्हणून प्रयत्न सुरू ठेवा.जीवन खूप सुंदर आहे इथ सर्वांनाच संधी मिळत असतो. प्रत्येक गोष्टीचा व क्षणाचा आनंद घ्या. कारण जिवन हा फक्त एकदाच मिळत असतो.अपयशाला न घाबरता प्रयत्न करीत राहा. कधीतरी यश नक्कीच मिळेल. परिस्थिती कधीच सारखी नसतो यश अपयश हे जिवनात येतच राहणार फक्त हिम्मत ठेवायला शिका. कारण 'वक्त हर किसी का आता है '.

**नाव – प्रिती व्ही. खोब्रागडे**
**मू. गुरढा. लाखनी**

# बंड करा

तुम्ही एखाद्या ठिकाणी कोणत्याही स्तरावर काम करत असाल तर तुम्हाला मानसिक त्रास हा होतोच. हा कृत्रिम मनुष्यनियम झाला आहे. जीवघेण्या स्पर्धेच्या व धकाधकीच्या जीवनात फास्ट फॉरवर्ड दुनियेत माणुसकी अजिबातच शिल्लक राहिली नाही. जो तो मानसिक तणावात वावरत आहे. ज्याला त्याला मानसिक त्रासामधुन आपले जीवन जगावे लागत आहे. जोतो वरिष्ठांचा, समाजातील विशिष्ठ व वरिष्ठ घटकांच्या दबावाखाली येऊन काम करतो आहे. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व इतर विविध क्षेत्रांमधील वाढत्या मानसिक दबावतंत्रामुळे अनेकांनी आपली जीवनयात्रा संपवली. त्याचं कारण म्हणजे ते समाजामध्ये एडजस्ट झालेच नाही व त्याचा परिणाम म्हणून मरण पत्कारलं. जीवनात काही लोकं तत्वनिष्ठ व स्वाभिमानी असतातात. त्यांना समाजातल्या काही गोष्टी नेहमीच बोचत असतात, खटकत असतात. त्यामुळे अशा घोडयांचा आणि समाजामधील कुविचारी गाढवांसोबत मुळीच ताळमेळ लागत नाही. त्यामुळे ते बंड करतात व आपला स्वतंत्र रस्ता निवडून समाजापासून अलिप्त राहण्याचा प्रयत्न करतात. अनेक संस्था, कंपन्या, शासकिय कार्यालयं, पक्ष इत्यादी ठिकाणी अनेकांना काम करतांना आपल्या वरिष्ठांकडून मानसिक त्रास होत असतो. ते त्यांच्या पदाचा दुरूपयोग करुन मनमानी करतात व त्याचा त्रास हा त्यांच्या अंतर्गत काम करणारांना निश्चितच होत असतो. त्यामुळे मानवी मनावर प्रत्यक्ष अप्रत्यक्ष बरडन येणारच. अशा वेळेला अनेकजण चुप्पी करुन गप्प बसतात व त्रास देणारे मात्र त्यांचा सपाटा चालूच ठेवतात. त्यामुळे त्यांना अशा प्रकारे वागण्यासाठी भरपूर प्रमाणात उर्जा मिळते. म्हणून असे कोणासोबत होऊ नये आणि जर का कोणी विनाकारण त्रास देत असेल तर बंड करा व त्याला तिथेच ठेचा. शाब्दीक, शारिरीरिक, मानसिक अथवा इतर माध्यमातून का होईना वेळीच उत्तर द्या. विनाकारण कोणच्याही दबावाला बळी पडू नका. बंड करायला शिका अन्यथा घोडयांऐवजी समाजातील त्या कुविचारी व इतरांना त्रास देण्याऱ्या मानसिकतेच्या गाढवांमध्ये तुमचीसुध्दा गणणा केली जाईल. स्वाभिमानाने जगायला शिका. आपल्या परिवारातील सदस्यांचा व समाजातील प्रत्येकाने प्रत्येकाचा सन्मान करायला शिकलं पाहिजे. समाजामध्ये अनेक प्रवृत्तीचे लोक असतात. व्यक्ती तितक्या प्रवृत्ती. त्यामुळे त्यांच्या नादी न लागता काही वेळेला आपण जाऊदया म्हणून काही गोष्टी सोडून देतो व पाहून न पाहिल्यासारख्या करतो मात्र अशा वेळेला समोरच्याची ताकद अधिकच वाढते व त्याला लगाम लागत नाही. एरवी काही गोष्टींमध्ये वायफळ वेळ वाया घालवून आपण विनाकारण आपली उर्जा खर्च करतो. विनाकारण वाया जाणाऱ्या उर्जेची बचत करुन अशा महत्वाच्या ठिकाणी त्याचा उपयोग करावा जेणेकरुन मानसिक त्रासात व कोणाच्याही दबावाखाली येऊन काम करावं लागणार नाही. महत्वाचं म्हणजे असं जगण्यापेक्षा बंड केलेला केंव्हाही उत्तमच. इतिहास साक्षीला आहे बंड केल्यामुळे व अन्यायाविरोधात आवाज उठवल्यामुळे आज आपण स्वातंत्र्यामध्ये व सुखात दिवस काढतो आहोत अन्यथा आजही आपण कोण्या एका इंग्राजाच्या घरी गुलामी करत असू. हे एक उदाहरण आहे पण हे बंड केल्यामुळेच क्रांती घडू शकली हे सत्य आहे. पण बंड हा नेहमी चांगल्या कामासाठी केला गेला पाहिजे. विनाकारण प्रत्येकवेळी बंड करणे म्हणजे मनमानी असणारी एक घाणेरडी सवय होऊ शकते. त्यासाठी वेळ ओळखा, स्वत:ला ओळखा व स्वाभिमानाने जगा. एखादी हक्काची गोष्ट व्यवस्थेकडून, समाजाकडून मिळत नसेल तर ती मिळवण्यासाठी प्राण एकवटून प्रयत्न करा. जगाच्या पाठीवर अशी एकही गोष्टी नाही की ती अशक्य आहे. पृथ्वीतलावर सर्वच गोष्टी शक्य आहेत फक्त त्यासाठी आपण प्रयत्नशिल रहायला हवं. बाळ रडल्याशिवाय आईला कसं कळणार की त्या बाळाला भुक लागली आहे. हा निसर्गनियम आहे. म्हणूनच तुम्हाला तुमच्या आयुष्यात महान कार्य करुन दाखवायचं असेल व यशाच्या शिखरावर पोहचायचं असेल तर त्या बाळासारखं रडलं पाहिजे, हक्क मिळवला पाहिजे. निवांत हातावर हात ठेऊन अन्याय सहन करत न बसता समाजात होणाऱ्या अन्यायाविरोधात, विनाकारण त्रास देणारांच्या विरोधात हिम्मत करुन आवाज उठवलाच पाहिजे. उठा जागे व्हा व अन्यायाविरोधात व समाजामध्ये विनाकारण होणाऱ्या त्रासाच्या विरोधात बंड करा.

**–शंकर चव्हाण**
(महाराष्ट्र राज्य) ९९२१०४२४२२

# राशी भविष्य

२१ मार्च २०२४ (पीएसआय)

मेष : शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा:दक्षिण
आपल्या चातुर्याचे आपले अधिकारी कौतुक करतील. चांगल्या बातम्या ऐकण्यास मिळतील. आर्थिक आवक वाढेल. कोणतेही काम करतांना दोनदा विचार करा.

वृषभ : शुभ रंग:लाल, शुभ दिशा:दक्षिण
बुद्धीचे कामे अधिक करू नका. आहारात नियमितता ठेवा. व्यापार मध्यम राहील. व्यक्तिगत समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. कुटुंबातील जबाबदारीकडे लक्ष द्या.

मिथुन:शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व
रोजगारात परिवर्तन कींवा नवीन संधी चालून येईल. कार्यक्षमता वाढणार आहे. स्वत:च्या बुद्धीने कामे करा. विरोधकांपासून सावध रहा. कुटुंबात सहकार्याचे वातावरण राहील.

कर्क :शुभ रंग:निळा, शुभ दिशा: उत्तर
विचारपूर्वक काम करून आर्थिक स्थिती सुधरू शकता. आशाजनक वातावरण निर्माण होईल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. प्रवास शक्यतो टाळा.

सिंह : शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:पूर्व
कोणत्यातरी प्रसिद्ध व्यक्तिशी संबंध वाढतील. आरोग्य चांगले राहील व्यापारामध्ये विस्तार होईल. स्थावर मालमत्तेची विक्री करतांना घाई गडबड करू नका.

कन्या : शुभ रंग:गुलाबी,शुभ दिशा: उत्तर
अडकलेली कामे वेळेत पूर्ण होतील. व्यापारात फायदा होईल. मोठ्या लोकांशी संबंध वाढतील. आर्थिक चिंता सलत राहील. कौटुंबिक तणाव रहाण्याची शक्यता.

तुळ : शुभ रंग:केसरी,शुभ दिशा: पश्चिम
चांगल्या व्यक्तींचा संप ठेवा. आर्थिक आवक वाढणार आहे. आपल्यापेक्षा मोठ्या लोकांचा आदर व सेवा करा. आळस सोडून द्या. समाजात आपली पत वाढेल.

वृश्चिक : शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:पश्चिम
कौटुंबिक सहकार्य मिळाल्याने आजचा दिवस आनंदी जाईल. पराक्रम व क्षमतेमुळे आपल्याला यश व फायदा होईल. खर्च विचार करून करा. रोजगारात प्रगती राहील.

धनु: शुभ रंग: लाल, शुभ दिशा: उत्तर
धार्मिक, शुभकार्याची आखणी कराल. आपल्या लोकप्रियतेचा फायदा होईल. आरोग्य मध्यम राहील. मेहनतीवर विश्वास ठेवा चांगले फळ मिळेल. कौटुंबिक सुख मिळेल.

मकर: शुभ रंग : जांभळा,शुभ दिशा:पूर्व
शुभचिंतकाची भेट झाल्यामुळे आनंदी रहाल. कौटुंबिक व सामाजिक स्तरावर मान सन्मान व प्रतिष्ठा मिळेल. खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

कुंभ : शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा:दक्षिण
व्यापारातील फायदा, मानसिक प्रसन्नता व उत्साह वाढविल. मुलांच्या भविष्याची काळजी राहील. आर्थिक स्थिती चांगली राहील. कौटुंबिक समाधान मिळेल.

मीन : शुभ रंग : निळा, शुभ दिशा :पश्चिम
व्यवसायात अडचणींना तोंड द्यावे लागणार आहे. भ्रमात न राहता स्व:विवेक बुद्धीने काम करा. कौटुंबिक परिस्थिती तणावपूर्ण राहील.

२१ मार्चला जन्मलेल्या लोकांचा भविष्य
स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर चंद्र, सुर्य, गुरू व मंगळाचा प्रभाव आहे. तुमच्याकडे ऊर्जेचा प्रचंड साठा आहे. न थकता तुम्ही बराच काळ काम करू शकता. तुमच्या उत्साही स्वभावामुळे इतरांनाही स्फूर्ती मिळते. नेतृत्वाचे गुण तुमच्या अंगी जन्मजात असतात. लोकांची दु:खे, समस्या दूर करण्यासाठी तुम्ही तत्पर असता. वेळप्रसंगी त्यासाठी सामाजिक आंदोलनही उभारता. ऐहिक गोष्टींबरोबर आध्यात्मिक प्रगती करून घेण्यातही तुम्हाला रस असतो. नीतीमुल्यांना, कायद्याला सोडून तुम्ही सहसा वागत नाही. इतरांनीही आपल्यासारखी ही मुल्ये पाळावीत अशी तुमची अपेक्षा असते. आपल्या आस्मितेचे रूपांतर गर्विष्ठपणात होऊ देऊ नका. इतरांच्या सल्ल्यामधले तथ्य ओळखायला शिका. इतरांच्या कामात स्वत:ला गुंतवून घेतांना आपले नुकसान होणार नाही ते पहा. आपल्या वजनावर नियंत्रण ठेवा. नाहीतर मधुमेह, उच्च रक्तदाबासारखी दुखणी उद्भवतील. संतापामुळे डोकेदुखीचाही त्रास होईल.

कार्यक्षेत्र : समाजाचे कल्याण व्हावे या हेतूने कार्य करणाऱ्या खाजगी व शासकीय संस्था तुमच्या मानसिक जडणघडणीस अनुकूल ठरतील. शासकीय समाजकल्याण केंद्रे, इस्पितळे, महानगरपालिका अशा ठिकाणी महत्वाचे पद तुम्हाला लवकर मिळू शकेल. इतरांशी संवाद साधणे शक्य असल्याने सहकारी गृहनिर्माण संस्था, साखरकारखाने, पतपेढ्या या प्रांतात प्रगती होऊ शकते. शिक्षण, अध्यापन, न्यायदान, बँकिंग, पत्रकारिता हे व्यवसायही उत्कर्षास पूरक ठरतील. प्रणयी जीवन : जोडीदारानेही आपल्यासारखाच समाजकार्यात रस घ्यावा अशी तुमची अपेक्षा असते. निदान आपल्या कार्याला त्याने मनापासून उत्तेजन पाठिंबा द्यावा असेही तुम्हास वाटते. वैवाहिक जीवनात तुम्ही सुसंवाद, समाधान, संतोष यांना महत्व देता. स्वार्थी लंपट माणसे तुम्हाला आवडत नाहीत. ऑक्टोबर २३ ते नोव्हेंबर २२ मधील व्यक्ती टाळा. मे २१ ते जून २० दरम्यानच्या व्यक्तीतून निवड करा.

वर्षफळ : शिक्षण, वकिली, कारखानदारी या क्षेत्रात उत्पन्नाचे नवे स्त्रोत निर्माण करू शकाल. व्यवसायात गुंतवणूक करण्यास हरकत नाही. जानेवारी फेब्रुवारी मध्ये प्रभावी वकृत्वाने राजकारण गाजवाल. मार्च एप्रिल मध्ये उच्च शिक्षण, प्रशिक्षणाची संधी सोडू नका. जून जुलै मध्ये नवे प्रतिबंध निर्माण होण्याची शक्यता आहे. मंगलकार्ये ठरतील. सप्टेंबर मध्ये दूरचे प्रवास, उच्च पदस्थांच्या भेटीतून कामे होतील. नोव्हेंबर मध्ये सत्तेपासून काही काळ दूर राहिल्याने अस्वस्थता जाणवेल.

महत्वाचे वर्ष : ३, १२, २१, ३०, ३९, ४८, ५७, ६६, ७५.
भाग्यरत्न : पुष्कराज
याच तारेखेची व्यक्ती : बिस्मिल्ला खान, काननकौशल

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय–गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी–२४६९४६, मुख्य कार्यालय –५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी–२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी–(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय – दूरध्वनी – २२१४५३, उदगीर कार्यालय–(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक–**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक – **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

# सामाजिक बांधिलकी स्विकारुन सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी कार्य करावे - प्रा. लांडगे

धाराशिव दि.२० (प्रतिनिधी) - सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी सामाजिक बांधिलकी स्वीकारून समाजातील आढळल्या नडल्या व्यक्तींना मदत करण्याचे कार्य करावे असे आवाहन मागासवर्गीय सेवानिवृत्त कर्मचारी संघाचे प्रदेशाध्यक्ष अनंत लांडगे यांनी दि.१९ मार्च रोजी केले.

धाराशिव येथे मागासवर्गीय सेवानिवृत्त कर्मचारी संघाच्या बैठकीत ते बोलत होते. पुढे बोलताना लांडगे म्हणाले की, कर्मचारी हा नोकरीच्या सेवेतून सेवानिवृत्त होत असला तरी कर्मचाऱ्यांनी सामाजिक प्रश्नांवर सतत कार्यशील असले पाहिजे. तर मागासवर्गीय सेवानिवृत्त कर्मचारी संघ हे संघटन का स्थापन करावे लागले ? याची पाश्र्वभूमी विशद केली. तसेच यापूढे सतत सनदशीर मार्गाने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबत ते सोडविण्याचा प्रयत्न करु. तर सध्या समाजासमोर जे प्रश्न निर्माण झाले आहेत. ते सोडविण्याचा प्रयत्न करु असे आश्र्वासन त्यांनी दिले. यावेळी ए.आर. लामतुरे, व्ही.आर. बोरीकर, डी.टी. सुर्यवंशी, पी.एस. कांबळे, ऍड. डी.पी. कांबळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी अरुण बनसोडे, सुनिल बनसोडे, अशोक बनसोडे, पी.के. बनसोडे, एल.एस. माने, पी.आर. सवाई, यु.व्ही. माने, दिपक सरवदे, श्रीकांत माळाळे, राजेंद्र धावारे, श्रीकांत शिलवंत, विजय गायकवाड, सतिश बनसोडे, पी.आर. शिंदे, डी. टी. सुर्यवंशी, ए.आर. लामतुरे, पी.एस. कांबळे, व्ही.आर. बोरीकर आदीआदी उपस्थित होते. यावेळी विजय गायकवाड यांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. बैठकीचे प्रास्ताविक ऍड. सुदेश माळाळे यांनी तर आभार पी.के. बनसोडे यांनी मानले.

# लातूर जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात चिमण्यांसाठी खाद्य, पाण्याची सुविधा

लातूर, दि. २० : जिल्हाधिकारी कार्यालयात चिमण्यांसाठी खाद्य आणि पाण्याची सुविधा करण्यात आली असून यासाठी झाडांवर बांधण्यात आलेल्या कुंड्यांमध्ये जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते पाणी व खाद्य टाकून या उपक्रमाला प्रारंभ झाला. जागतिक चिमणी दिनानिमित्त वन विभागामार्फत हा उपक्रम राबविण्यात आला.

निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, रोहयो उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त रामदास कोकरे, वनपरिक्षेत्र अधिकारी सचिन रामपुरे, वन परिमंडल अधिकारी निलेश बिराजदार, वनरक्षक महेश पवार, बालाजी पाटील, श्री. भालेराव , बालाजी कांबळे यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कमर्चारी यावेळी उपस्थित होते.

चिमण्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत असून २० मार्च या जागतिक चिमणी दिनी याबाबत जनजागृती करण्यासाठी वन विभागाने पुढाकार घेतला आहे. याचाच एक भाग म्हणून आज जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात झाडांवर चिमण्यांसाठी खाद्य आणि पाण्याच्या कुंड्या बांधण्यात आल्या. प्रत्येक नागरिकाने चिमण्यांसाठी आपल्या घराच्या गॅलरीमध्ये खाद्य पाण्याच्या कुंड्या ठेवाव्यात. तसेच चिमण्यांसाठी नैसर्गिक अधिवास तयार करण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी यावेळी केले.

# नेहमीच रुग्णसेवेत व्यस्त असणाऱ्या डॉक्टरांचे कलाविष्कार थक्क करणारे :वैशाली देशमुख

लातूर : - इंडियन मेडिकल असोसिएशन, लातूर व वुमेन्स डॉक्टर्स विंग चा सांस्कृतिक महोत्सव दिनांक १७ मार्च, २०२४, रविवारी दयानंद सभागृह येथे जल्लोषात साजरा करण्यात आला. ह्या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून विलास सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्षा वैशालीताई विलासराव देशमुख यांची उपस्थिती होती. सदस्य डॉक्टरांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा व व्यस्त दिनचर्येमधून वेळ काढून कुटुंबीयांसोबत मनोरंजन व कलाविष्काराचा आस्वाद घेता यावा ह्यासाठी इंडियन मेडिकल असोसिएशन, लातूर तर्फे दरवर्षी सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात येते.

कार्यक्रमाची सुरुवात कथक नृत्यांगना श्वेता तंत्रे व त्यांच्या चमूने सुंदर अशा गणेश वंदनेने करून सर्वांना मंत्रमुग्ध करून टाकले. अनेक डॉक्टरांनी ह्या प्रसंगी आपल्या गीतगायन आणि नृत्य या कलाविष्कारांचे सादरीकरण केले. उद्घाटन कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवरांच्या दीप प्रज्वलन व धन्वंतरी प्रतिमेचे पूजन करून झाली. याप्रसंगी आयएमए लातूरचे अध्यक्ष डॉ. अनिल राठी यांनी त्यांच्या अध्यक्षतेखाली आयएमए लातूरने वर्षभर केलेल्या कामाचा आढावा घेतला. वर्षभरात इंडियन मेडिकल असोसिएशन, लातूर शाखेने अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवले जसे की; वेगवेगळ्या महत्त्वाच्या दिवशी रॅली ज्यामध्ये सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या तंबाखू मुक्ती, व्यसनमुक्ती, मानसिक आरोग्य, महिला दिवस, आरोग्य दिवस, आत्महत्या प्रतिबंध, अस्थमा ह्या विषयांवर रांगोळी, पोस्टर अशा विविध माध्यमांद्वारे जनजागृती करण्यात आली. मधुमेहावर बोलू काही व हृदयरोग कसा टाळावा? यावर तज्ज्ञांबरोबर जनसंवाद कार्यक्रम देखील घेण्यात आले. ह्या उपक्रमाचा हजारो रुग्णांनी लाभ घेतला. लोकनेते स्वर्गीय विलासरावजी देशमुख यांच्या पुण्यतिथीनिमित्त सुमारे २२५ रुग्णालयांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य शिबिरांमध्ये २०००० पेक्षा जास्त रुग्णांनी तपासणी करून घेतली. मिशन पिंक हेल्थ च्या माध्यमातून १५ शैक्षणिक संस्थांमधील ३५०० पेक्षा जास्त शाळकरी मुली, त्यांच्या माता व शिक्षिका यांच्यामध्ये मासिक पाळी, सोशल मीडिया चा सुरक्षित वापर, शारीरिक व मानसिक आरोग्य याबद्दल समुपदेशन शिबिरे घेण्यात आली. आयएमए च्या मआओ गाव चलेफ मोहिमेअंतर्गत ग्रामीण भागात आरोग्य शिबिरे व समुपदेशन शिबिरे आयोजित

करण्यात आली. वाहतूक नियंत्रण पोलीस शाखा यांच्या सहयोगाने पोलीस कर्मचारी, ऑटो रिक्षा, टॅक्सी व बस चालकांसाठी आरोग्य शिबिर घेण्यात आले. ह्या शिबिरात व डॉक्टर्स डे च्या निमित्ताने रक्तदान शिबिर आयोजित करून १५० पेक्षा जास्त रक्त पिशव्यांचे संकलन करण्यात आले. संघटनेच्या मजबुतीकरणासाठी ७६ नवीन सदस्यांची नोंदणी करण्यात आली. डॉक्टरांच्या व रुग्णालयांच्या दृष्टीने महत्त्वाचे विषय जसे की हॉस्पिटल रजिस्ट्रेशन संबंधित समस्या यासाठी शासकीय अधिकारी व लोकप्रतिनिधी यांच्याशी संपर्क व चर्चा, डॉक्टर व रुग्ण यांच्यातील सुसंवाद वाढवा म्हणून पावले उचलणे तसेच विविध परिषदांमार्फत शैक्षणिक चर्चासत्रे आयोजित करण्यात आली. त्याबद्दल डॉ. अनिल राठी ह्यांनी विस्तृत माहिती दिली.

आयएमए लातूरचे सचिव डॉ. आशिष चेपुरे यांनी मागील वर्षातील संघटनेच्या महत्त्वाच्या उपलब्धींची माहिती दिली. इंडियन मेडिकल असोसिएशन लातूर तर्फे आयोजित जागतिक योग दिवस व जागतिक सायकल दिवस ह्या आरोग्यदायी जीवनशैलीला प्रोत्साहन देणाऱ्या उपक्रमांना भरघोस प्रतिसाद लाभला. ३ मार्च रोजी झालेल्या आयएमएथॉन लातूर २०२४ ह्या मॅरेथॉन स्पर्धेत १५०० पेक्षा जास्त धावपटूंचा सहभाग नोंदविला गेला. महिला सक्षमीकरण, समानता व सर्वांसाठी आरोग्य ह्या थीमला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. वर्षभरात डॉक्टर व त्यांच्या कुटुंबीयांसाठी डॉक्टर्स क्रिकेट लीग, इनडोअर स्पोर्ट्स फेस्टिवल ज्यामध्ये कॅरम, चेस, टेबल टेनिस, बॅडमिंटन, जलतरण इत्यादींच्या स्पर्धा घेऊन बक्षिसे देऊन सहभागींना प्रोत्साहित करण्यात आले. डॉक्टरांच्या कलागुणांना प्लॅटफॉर्म मिळावा यासाठी ड्रॉईंग स्पर्धा, रांगोळी कॉम्पिटिशन, फोटोग्राफी व पोस्टर कॉम्पिटिशन सुद्धा घेण्यात आले. अशाप्रकारे इंडियन मेडिकल असोसिएशन, लातूर शाखेतर्फे सदस्य डॉक्टरांच्या सर्वांगीण विकासासाठी वर्षभर विविध उपक्रम राबवण्यात आले असे डॉ. आशिष चेपुरे ह्यांनी उपस्थितांना सांगितले.

प्रोजेक्ट चेअरमन व उपाध्यक्ष डॉ. अशोक पोद्दार यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यामागची भूमिका विशद केली. वुमन्स डॉक्टर विंगच्या अध्यक्षा डॉ. प्रीती बादाडे व सचिव डॉ. प्रियंका राठोड यांनी त्यांच्या विंगद्वारे घेण्यात आलेल्या उपक्रमांची माहिती दिली. प्रमुख पाहुण्या वैशालीताई विलासराव देशमुख यांनी सतत समाजोपयोगी उपक्रम राबवल्याबद्दल इंडियन मेडिकल असोसिएशन, लातूर शाखेचे अभिनंदन केले व डॉक्टरांच्या व्यस्त आयुष्यातून वेळ काढून त्यांचे कलागुण जोपासण्यासाठी सांस्कृतिक महोत्सव आयोजित केल्याबद्दल इंडियन मेडिकल असोसिएशन, लातूरच्या पदाधिकाऱ्यांचे कौतुक केले. लातूरकर हे कला, क्रीडा, शिक्षण, आरोग्य या सर्वच क्षेत्रांमध्ये नेहमीच अग्रेसर असतात आणि याचा मला अभिमान वाटतो असेदेखील त्यांनी आवर्जून नमूद केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कोषाध्यक्ष डॉ. अर्जुन मंदाडे यांनी केले. याप्रसंगी उपसंचालक आरोग्य सेवा डॉ. अर्चना भोसले-किर्दक, आयएमए लातूरचे नियोजित अध्यक्ष डॉ. उमेश कानडे यांची देखील उपस्थिती होती. इंडियन मेडिकल असोसिएशन लातूरचा सांस्कृतिक महोत्सव यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष डॉ. अनिल राठी, उपाध्यक्ष व प्रोजेक्ट चेअरमन डॉ. अशोक पोद्दार, सचिव डॉ. आशिष चेपुरे, डॉ. अर्जुन मंदाडे, वुमन्स विंगच्या डॉ. प्रीती बादाडे व डॉ. प्रियंका राठोड व आयएमए लातूरची सांस्कृतिक समिती यांनी परिश्रम घेतले. आयएमएच्या राज्यस्तरीय कलादर्पण महोत्सवांमध्ये पारितोषिके मिळविलेल्या आयएमए लातूरच्या सदस्यांचा याप्रसंगी प्रमुख पाहुणे वैशालीताई देशमुख यांच्या हस्ते सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला. आयएमए लातूर व मनियार डायग्नोस्टिक सेंटर, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेचे बक्षीस वितरण देखील ह्या प्रसंगी करण्यात आले. यामध्ये कृष्णा राहुल अभंगे, माही शाम तोष्णीवाल, अद्वय प्रमोद टिके यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषिके पटकावली. राज्यस्तरीय पुरस्कारांमध्ये डॉ. अशोक आरदवाड यांना फोटोग्राफीसाठी, डॉ. रामेश्वरी अलाहाबाद यांना चित्रकलेसाठी, तर डॉ. अनघा राजपूत -निबंध स्पर्धा, डॉ. स्वप्ना उटीकर व डॉ. नीलरोहित पैके - गीत गायन, डॉ. निलेश नागरगोजे - कविता व डॉ. मोहिनी गानू व डॉ. राजश्री सावंत यांना नृत्य या प्रकारांमध्ये पारितोषिके मिळाली. तसेच बॅडमिंटन बॅडमिंटन बॅडमिंटन स्पर्धेमधील विजेते डॉ. सुधीर जटाळ व डॉ. प्रशांत कापसे आणि उपविजेते डॉ. गणेश असावा, डॉ. अयाज शेख, डॉ. विष्णुदास खंदाडे यांना देखील ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. तसेच इंडियन मेडिकल असोसिएशन लातूर शाखेचा संपूर्ण राज्यात कलादर्पण महोत्सवांमध्ये सर्वाधिक पारितोषिके मिळवल्याबद्दल सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. प्रमुख पाहुण्या वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या हस्ते अध्यक्ष डॉ. अनिल राठी व सचिव डॉ. आशिष चेपुरे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. ह्या सांस्कृतिक महोत्सवाची थिम भारतीय संस्कृतीच्या विविधतेची झलक अशी निवडण्यात आली होती. गायन प्रकारात एकल गीतांचे सादरीकरण डॉ. स्वप्ना उटीकर, डॉ. अनिता पवार डॉ. श्रीकांत बाहेती, डॉ. पद्मा बियाणी, डॉ. निलरोहित पैके, डॉ. अयाज शेख, डॉ. श्रीनिवास हसनाळे, डॉ. पूनम चिपडे, डॉ. अनुजा कुलकर्णी यांनी करून आपल्या सुमधुर आवाजाने उपस्थितांची मने जिंकली. तसेच डॉ. दत्तात्रय मंदाडे व डॉ. उज्वला कुलकर्णी, डॉ. शिल्पा दडगे व डॉ. किरण होळीकर, डॉ. मनोज पर्बत व डॉ. आनंद गोरे यांनी डुयएट गाण्यांचे उत्कृष्ट सादरीकरण करत प्रेक्षकांना खिळवून ठेवले.

डॉक्टरांनी सादर केलेल्या कलाविष्कारांचे दिग्दर्शन व संयोजन कोरियोग्राफर समीर बजाज, आकाश मोहिते, सौरभ हुडगे व संगीतकार व गायक डॉ. सुधीर बनशेळकीकर यांनी केले. इंडियन मेडिकल असोसिएशन, लातूरचा सांस्कृतिक महोत्सव यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष डॉ. अनिल राठी, उपाध्यक्ष व प्रोजेक्ट चेअरमन डॉ. अशोक पोद्दार, सचिव डॉ. आशिष चेपुरे, कोषाध्यक्ष डॉ. अर्जुन मंदाडे, वुमन्स विंगच्या डॉ. प्रीती बादाडे व डॉ. प्रियंका राठोड व आयएमए लातूरची सांस्कृतिक समिती यांनी परिश्रम घेतले.

# युवा नेतृत्व : अमित देशमुख

आज २१ मार्च अमित विलासराव देशमुख यांचा जन्मदिवस माजी कॅबिनेटमंत्री, एक युवा राजनेता आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे सचिव, माजी मुख्यमंत्री स्वर्गीय विलासरावजी देशमुख साहेबांचे सुपुत्र व सहकार महर्षी माझी क्रिडा व युवक कल्याणमंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांचे पुतने म्हणून त्यांची ओळख उभ्या महाराष्ट्राला आहे.

सर्वप्रथम माझी कॅबिनेटमंत्री अमित देशमुख यांना जन्मदिवसाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा त्यांच्या जन्मदिवसांच्या निमित्ताने त्यांनी केलेल्या कार्याची ओळख.

१. लातूरचे सुपूत्र (अमित भैय्या)

अमित देशमुख यांचा जन्म २१ मार्च ला झाला. असून ते काँग्रेस नेता विलासराव देशमुख यांचे जेष्ठ सुपूत्र आहेत. ते राष्ट्रीय काँग्रेसचे सचिव आहेत. आपल्या वडीलांच्या व कांकांच्या मार्गदर्शनाखाली त्यानी राजनीतिक करियरची सुरुवात केली. २१ वर्षाला महाराष्ट्र युथ काँग्रेस नेता म्हणून राजकारणात पर्दापण केले तसेच लातूर मधील सर्व लोक त्यांना प्रेमाने अमित भैय्या या नावाने ओळखतात.

२. राजकीय वारसा प्राप्त : महाराष्ट्र राज्यातील सगळ्यात मजबूत काँग्रेस पक्षाच्या नेत्यामधील विलासराव देशमुख हे होते. त्यांचे सुपुत्र म्हणून अमित भैय्या यांची ओळख तर आहेच परंतु त्यांच्या कार्यानी त्यांनी स्वत:चे एक वेगळे वलय सुद्धा निर्माण केलेले असून आपले आजोबा दगडूजीराव देशमुख आपले वडील माजी मुख्यमंत्री स्वर्गीय विलासरावजी देशमुख व माजी मंत्री दिलीपरावजी देशमुख यांचा राजकीय वारसा प्राप्त झालेले अमित भैय्या देशमुख होय.

३. लोकाभिमूख राजकारणी : कौशल्य, साहित्य कला संस्कृती या विषयीची जाण हे गुण ध्यानात घेतले तर आपणास अमित देशमुख हे लोकाभिमुख राजकारणी आहेत हे लक्षात येईल. लोकामध्ये राहणी, लोकांचा सहवास हे सर्व गोष्टी त्यांना मनातून प्रिय असलेल्या आपणास दिसून येतात. सुख-दु:खामध्ये सहभागी होण्यामध्ये अमितभैय्या त्यांच्या या गुणाची आपणास प्रचिती येते.

४. विभिन्न पदाचे मानकरी : अमित विलासराव देशमुख साहेबांनी विविधा पद भूषविली असून त्यामध्ये लातूर नगरपरिषदेमध्ये सक्रियता व २००२ आणि २००४ मध्ये युवा काँग्रेसचे उपाध्यक्ष होते. २००९ मध्ये आमदार झाले. हा विजय महाराष्ट्रात चौथ्या नंबरची सगळ्यात मोठी विजय होती. ८०,४८० मतांनी ते लातूरमध्ये विजयी झाले. २०१४ मध्ये पर्यटन, खाद्य आणि औषधी प्रशासन, उत्पादन शुक्ल व नवीकरणीय उर्जाराज्य मंत्री पद त्यांना मिळाले २०१९ मध्ये ते पुन्हा लातूरचे आमदार म्हणून विजयी झाले आहेत. वैद्यकीय शिक्षण आणि सांस्कृतिक कार्य खात्याचे कॅबिनेट मंत्रीपद त्यांना देण्यात आलेले होते. सध्या ते राष्ट्रीय पातळीवर काँग्रेसचे सचिव आहेत.

५. प्रभावी वक्तृत्व शैली अमित देशमुख यांचे वक्तृत्व सेम टू सेम विलासराव देशमुख साहेबांची आठवण करून देणारे आहे. विलासरावाची लकब आपणास त्यांच्या भाषण शैलीमधून दिसून येते तसेच आपल्या भाषणातून ते कधी फिरकी घेतात, कधी व्यंग्य करतात तर कधी टोलेबाजी करतात, परंतु ते कधीच व्यक्तिगत पातळीवर कोणास आरोप-प्रत्यारोप करत नाहीत त्यांच्या आवाजात एक प्रखडपणा, दमदारपणा दिसून येतो तसेच भाषाणातून त्यांचे मत ते स्पष्टपणे मांडतात.

६. महाराष्ट्राचे नेतृत्व करणारा सक्षम नेता : महाराष्ट्राला नवीन नेतृत्वाची गरज आहे. जे पक्षाशी एकनिष्ठ आहे जो पक्षाच्या बळकटीस चालणा देतो व त्याच्या रक्तात पक्षाबद्दल निष्ठा आहे असा राजकीय वारसा असलेला राजकारणाचे बालकडू पिलेला युवा नेता म्हणून अमित विलासराव देशमुख यांच्याकडे उभा महाराष्ट्र डोळे लावून वाट पाहत आहे की त्यांनी महाराष्ट्राची धुरा आपल्या हातामध्ये घ्यावी कारण ती वेळ आता आली आहे. हे एक सक्षम नेतृत्व म्हणून त्यांची उभ्या महाराष्ट्राचा भावी मुख्यमंत्री म्हणून आशा आहे व ती आशा नक्की पूर्ण होईल यात शंका नाही.

७. विलासरावाचे प्रतिबिंब : अमित देशमुख यांची आपल्या वडिलासारखी शैली आहे. यांच्यावर विलासराव देशमुख यांचा प्रचंड प्रभाव आहे. विलासरावसारखं दिसणं, त्यांचासारखा आवाज, त्यांच्यासारखीच कार्यशैली आणि अभ्यासूपणा त्यामुळे त्यांनी युवक काँग्रेसमध्ये प्रभाव पाडला आहे. मराठवाड्याचे मागासलेपण दूर करण्याची ताकत जशी विलासराव देशमुख यांच्याकडे होती. तशीच सक्षमता अमित विलासराव देशमुख यांच्याकडे आहे. कारण ते फक्त बोलण्यात व दिसण्यात विलासराव देशमुख साहेबासारखे नाहीत तर विलासराव देशमुख यांच्या विचाराचे प्रतिबिंब म्हणजेच अमित विलासराव देशमुख होय.

८. काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ : काँग्रेस पक्षाचा विचार प्रत्येक नागरिकापर्यंत न्यांवा लागेल तरच ते दिवस पुन्हा येतील असे मत मांडणारे अमित विलासराव देशमुख हे काँग्रेस पक्षासी एकनिष्ठ राहणारे नेते आहेत. समाजाशी जुडलेली नाळ तोडून इकडे-तिकडे जाणं त्यांना मान्य नाही आणि सर्वसामान्य माणसाच्या हृदयात विश्वास संपादन करत काँग्रेस पक्षाबद्दलची निष्ठा अमित भैय्या हे कायम जपत आहेत. ते नेहमी नागरीकांना सांगतात मी तुमच्याबरोबर आहे. विलासराव देशमुख साहेबाप्रमाणे अमित देशमुख सांगतात की माझ्या रक्तातच काँग्रेस आहे.

९. सामाजिक विश्वास प्राप्त नेता : अमितजी यांच्यावर समाजाचा दांडगा विश्वास आहे. कारण अमितजी यांनी आपल्या कार्यातून हे सिद्ध केले आहे तसेच ते कार्यकर्त्यांना सांगतात महाराष्ट्रातील जनतेने आपल्यावर फार मोठी जबाबदारी टाकली आहे. त्यामुळे आपल्याला काम करावे लागेल. तसेच ते नेहमी आपली जबाबदारी पार पाडत आले आहेत आणि म्हणूनच समाजाचा विश्वास अमित देशमुख यांच्यावर आहे.

१०. कर्तव्यदक्ष नेता : सामुदायिक विवाह सोहळा, अद्ययावत रूग्णवाहिका, पर्यावरणाचा संदेश, गरजू व गरीबासाठी मदत अशा अनेक उपक्रमांमध्ये सहभागी होऊन लोकांना नेहमी अडचणी पासून मुक्त ठेवण्याचे काम एक कर्तव्यदक्ष नेता म्हणून अमित देशमुख यांच्याकडे पाहिले जाते. तसेच आपल्या पक्षाला बळकट करणे व सातत्याने कार्य करण्याकडे अमित देशमुख यांचा कल दिसू येतो. आपल्या कार्यातून त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

११. सामाजिक संपर्काची ओढ : जिल्ह्यातील साखर कारखाने, जिल्हा मध्यवर्ती बॅक आणि शिक्षण संस्थांच्या माध्यमातून वाढलेला जनसंपर्क यांच्यामुळे ते सर्व सामान्याच्या पर्यंत पोहचतात. याशिवाय कार्यकर्त्यांच्या माध्यमातून तसेच प्रत्यक्षपणे एखादे काम पूर्ण होईपर्यंत त्याकडे पाठपुरावा करणे तसेच लोकांच्या दररोजच्या संपर्कातून त्यांच्या काय समस्या आहेत हे जाणून घेणे हे अमित देशमुख जातीने करतात.

१२. आपली भूमिका ठामपणे निभावणारा नेता अमित देशमुख आपली भूमिका ठामपणे मांडणारे धाडसी नेते असून नांदेड आणि लातूर जिल्ह्यातील अनेक नेते भाजपात प्रवेश करणार आहेत, असे बावनकुळे म्हणाले होते. माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी नुकताच भाजपात प्रवेश केला आहे, तसेच अमित देशमुख यांना आपणाही भाजपात जाणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात होता. त्यावर त्यांनी स्वत: प्रतिक्रिया दिली की आम्ही जिथे आहोत तिथ बरे आहोत यावरून प्रत्येक वेळी त्यांनी आपली भूमिका ठाम मांडली. मराठा आरक्षणाबाबतही ते सकारात्मक असून त्यांनी आपली बाजू मांडली.

१३. युवकांचे आदर्श नेतृत्व : युवकाना हवाय असे आदर्श नेतृत्व म्हणजे अमित भैय्या युवकांमध्ये उठ-बस करणारे, त्यांच्याशी संवाद साधणारे, त्यांच्या समस्या जाणून घेणारे अमित देशमुख युवकाचे आदर्श ठरले आहेत ते युवा नेतृत्व तर आहेतच, पण जबाबदार नेतृत्व सुद्धा म्हणून त्यांची ओळख आहे. नव्या पिढीचे प्रश्न, युवकांना हवे असणारे बदल, ते समजून घेतात, अमित देशमुख हे युवकासाठी लोकप्रिय असून ते शिक्षित, जबाबदार तसेच देशासाठी काही नवीन बदल घेऊन येणारे नेतृत्व आहे अशी युवकांची त्यांच्याबद्दची निष्ठा आहे.

१३. लातूरचे आयकॉन : एक राजकीय वारसा लाभलेले वयाच्या २१ वर्षापासून राजकारणात प्रवेश केलेले अमित देशमुख हे काँग्रेस पक्षाचे एकनिष्ठ सदस्य तर आहेतच ते काँग्रेस कमिटीचे राष्ट्रीय सचिव आहेत. कॅबिनेटमंत्री, राज्यमंत्री, विधानसभा सदस्य म्हणून त्यांनी कार्य केले तसेच त्यांचे सामाजिक, राजकीय, आर्थिक कार्य पाहता ते लातूरचे आयकॉन म्हणून युवकांच्या मनातील लोकप्रिय युवा नेते बनले आहेत.

१४. विलासराव देशमुख साहेबांची विचारधारा पुढे घेऊन जाणारा नेता : देशाच्या राजकीय क्षेत्रातील एक उमदे, सुसंस्कृत, कलाप्रेमी नेतृत्व विलासराव देशमुख यांच्या विचाराची शिकवण पुढे घेऊन जाणारे अमित विलासराव देशमुख एक सक्षम नेतृत्व आपणास मिळाले आहे. प्रशासनाच्या बारीकसारिक, खाचाखोचा, कार्यक्षम प्रशासक म्हणून अमित देशमुख यांची ओळख आहे. तळापासून वरपर्यंत राजकारण करत ते कॅबिनेटमंत्र्यापर्यंत पोहचले आहेत. आणि ते नक्कीच आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर महाराष्ट्राला विकासाची जोड देतील.

१५. सहकारमहर्षी दिलीपराव देशमुख साहेबांच्या तालमीतून घडलेला हिरा : सहकार महर्षी दिलीपराव देशमुख ज्यांनी सहकाराला नवीन दिशा व चालना दिली. तसेच जिल्हा सहकारी बँकेच्या माध्यमातून जिल्ह्यातील त्यांच्या शेतकर्यांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य दिले. फक्त विकासाचे राजकारण करणार्या काकांच्या सहवासातून राजकारणाचे धडे घेतलेले अमित विलासराव देशमुख जणू सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेबांच्या शिस्तप्रिय समाजप्रेमी, नेतृत्वाच्या तालमीतून घडलेला हिरा होय. जे आपल्या काकांच्या विचारसरणीचे प्रतिबिंब आपल्या कार्यातून समाजाला दाखवून देत आहेत.

१६. लातूरकरांच्या बद्दल विशेष ओढ : लातूरच्या लोकांना आपला परिवार माणनारे तसेच लातूरच्या लोकांचे दु:ख व समस्या माझ्या आहेत. असे माणनारे युवा नेते अमितजी देशमुख असून ते वेळोवेळी सर्वसामान्य लातूरकर, लातूरचे कार्यकर्ते, पदाधिकारी तसेच नौकरवर्ग यांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय समस्या सोडवण्यासाठी नेहमी तत्पर असतात त्यांच्या कार्यालयात सामान्य माणूस आपली निसंकोच तक्रार मांडू शकतो, कारण अमित देशमुख यांना लातूरकरांबद्दल विशेष ओढ आहे जशी माजी मुख्यमंत्री स्वर्गीय विलासराव देशमुख साहेब यांना होती.

१७. सकारात्मक विचाराचा पुजारी : काँग्रेस पक्षाबद्दल पुन्हा ते दिवस आणण्याचा उत्साह व युवकांमध्ये जोश भरण्याचे काम युवा नेते अमित देशमुख करतात तसेच आपल्या विकासाच्या कामावर कामाच्या मुद्द्यावर राजकारण, समाजासाठी, देशासाठी सकारात्मक विचार पुढे घेऊन जाणारा नेता म्हणून अमित विलासराव देशमुख यांच्याकडे पाहिले जाते. आशावादी भूमिका, सामाजिक उत्तरदायित्वाची भावना व नेहमी पक्षांतरणाच्या राजकारणातून स्वत:ला वेगळे ठेवून स्वत:मध्ये व जनतेमध्ये सकारात्मकतेचे विचार देणारे अमित देशमुख हे आजचे निर्णयक्षम नेते होय.१८. युवकामध्ये आत्मविश्वास निर्माण करणारे नेतृत्व : देशाची युवा पिढी हीच देशाचे भविष्य आहे. असा विश्वास मनी बाळगून युवांचे प्रश्न व त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करण्याची प्रखर इच्छा अमित देशमुख यांच्या अंगी आहे. युवाना काळानुरूप प्रगत करणे, योग्य व आधुनिक शिक्षण देणे, तसेच त्यांना संधी उपलब्ध करून देणे, रोजगार उपलब्ध करून देणे ह्या आजच्या तरूण पिढीच्या गरजा बनल्या आहेत. तसेच युवकांमध्ये विश्वास निर्माण करणारे हेच नेतृत्व म्हणजे अमित देशमुख होय.१९. यशस्वी नेता : जो नेता सक्षमपणे निर्णय घेतो तसेच जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडतो तोच यशस्वी नेता होय. अशा प्रकारे देशाचे भविष्य उज्वल करणारा यशस्वी नेता म्हणून अमित देशमुख यांच्याकडे पाहिले जाते. अमित देशमुख यांचा विधानसभेसाठी होणारा प्रचंड मतांनी झालेला विजय व त्यांचे कार्य त्यांना यशस्वी नेत्याच्या रांगेत बसवतो.

२०. नवीन उपक्रम : आमदार अमित देशमुख यांनी नवा संकल्प केला असून येणारे पदाधिकारी, कार्यकर्ते, निमंत्रितांकडून हार, पुष्पगुच्छ याऐवजी वह्या स्विकार केल्या जाणार आहेत तसेच ह्या वह्या गरजू विद्यार्थ्यांना वितरित केल्या जाणार आहेत. तसेच विविध कार्यक्रमात पाहुण्याचे स्वागत करण्यासाठी फुलांची कुंडी भेट देण्याची पद्धत सुरु करण्यात आली आहे हा नवीन उपक्रम अमित देशमुख यांचा आदर्श ठरला आहेच व सामाजिक संदेश देणारा आहे.

२१. छंद : राजकारणा व्यतिरिक्त अमित देशमुख यांना क्रिकेट व टेबल टेनिसमध्ये आवड आहे. आपल्या महाविद्यालयीन जीवनात त्यानी हे खेळ खेळले आहेत. तसेच मराठी थिएटर आणि संगीत विषयात ते आनंद घेतात. तसेच आधुनिक तंत्रज्ञानाबद्दल त्यांना आवड आहे.२२. शिस्तप्रिय, संयमित, मृदूभाषी नेता : राजकारणाचे स्वरूप कितीही बदलले असले तरी अमित देशमुख यांनी आपल्या स्वभावात आणि तत्वामध्ये सूतभरही बदल न करता लातूरकरांची मने जिंकलेली आहेत. राजकारणातील अत्यंत खडतर प्रवास त्यांनी आपल्या शिस्तप्रिय, संयमित, मृदूभाषी अशा गुणामुळे सुकर बनवला आहे. लातूरकरांची नाळ आणि कार्यकर्त्यांची मजबूत फळी यामुळेच विलासरानंतरही त्यांनी काँग्रेसचा बालेकिल्ला कायम ठेवला आहे. जिल्ह्यातील काँग्रेस उभारणीमध्ये त्यांचे योगदान कौतुकास्पद आहे. मितभाषी, धीर गंभीर अशी पालकमंत्री अमित देशमुख यांनी मतदार संघात ओळख निर्माण केली. २३. दूरदृष्टी व भविष्याचा वेध घेणारा नेता : अमित देशमुख यांच्याकडे दूरदृष्टी व भविष्याचा वेध घेण्याची कला आहे. कारण ते म्हणतात की एखादा नेता जेव्हा जनतेसाठी काम करतो तेव्हाच तो ओळखला जातो. त्यांनी विविध पदाचा कारभार पाहताना दूरदृष्टी व भविष्याचा वेध घेऊन निर्णय घेतले आहेत. अमित देशमुख यांना नवीन लोकहिताचे उपक्रम करण्याची जिद्द असते. तसेच त्यांच्या चांगल्या कार्यामुळे अनेक सुधारणा घडून आलेल्या आपणास दिसून येतात.२४. सर्वसामान्याचा नेता : अमित देशमुख यांची युवा नेता म्हणून ओळख आहे. परंतु त्यांच्या सामाजिक कार्याच्या माध्यमातून ते सर्व सामान्याचे ने

# तालुक्यात विजवितरणच्या ग्राहकाकडे ५१ लाखाची थकबाकी

**प्रशांत तांबोळकर**

शिरूरआनंतपाळ : तालुक्यातील साकोळ व शिरूर अनंतपाळ सर्कलमधील विजीवतरणच्या शेतीसह शेकडो ग्राहकाकडे थकबाकी असून त्यात सर्वाधिक घरगुती वीज मीटरच्या ग्राहकाकडे तब्बल ४४ लाख रुपयाची थकबाकी असल्याची माहिती उपकार्यकारी अभियंता एल. जी. जोंधळे यांनी लोकमत प्रतिनिधीशी बोलताना दिली .

साकोळ व शिरूर अनंतपाळ महावितरण केंद्राच्या अंतर्गत घरगुती , वाणिज्य व औद्योगिक क्षेत्रातील ग्राहकाकडे जवळपास साडे एक्कावन्न लाखाची मार्च २०२४ पर्यंतची थकबाकी असून त्यात तीन हजाराहून अधिक घरगुती वीज मीटर ग्राहककाकडे जवळपास ४४ लाख १४ हजाराची थकबाकी असून त्यात अधिक थकबाकी असणाऱ्या ग्राहकांचा वीजपुरवठा खंडीत केला जात आहे . जोपर्यंत थकबाकी भरली जाणार नाही तोपर्यंत विजपुरवठा सुरळीत न करण्याचा निर्णय घेतला असून वसुलीसाठी लाईनमॅन प्रत्येक गावागावात फिरत आहेत . तर घरणी , साकोळ व पांढरवाडी प्रकल्पातील पाणी आरक्षीत केल्याने वीजपुरवठा प्रशासनाच्या सुचनेवरून खंडित केला गेला आहे .

तर सार्वजनिक पाणीपुरवठा असलेल्या ठिकाणी पाण्याची टंचाई लक्षात घेवून वीजपुरवठा सुरळीत चालू ठेवण्यात आला आहे . पण ग्रामपंचायत, शाळा , व सार्वजनिक पाणीपुरवठा करणाऱ्या यंत्रणेला थकबाकी भरण्यासाठी नोटीसा देण्यात आलेल्या आहेत . तालुक्यात महावितरणच्या विविध क्षेत्रातील ग्राहकांनी थकबाकी भरून घ्यावे असे आव्हान उपकार्यकारी अभियंता व कनिष्ठ अभियंता बिरादार यांनी केले आहे .

# भविष्य निर्वाह निधी पावत्या देण्यात याव्यात- मराठवाडा शिक्षक संघाचे निवेदन

नांदेड (प्रतिनीधी): भविष्य निर्वाह निधी पावत्या नसल्यामुळे आवश्यक बाबींसाठी या खात्यामधून रकमा काढण्यात राज्यातील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना अडचणी येत आहेत. त्यामुळे भविष्य निर्वाह निधीच्या प्रलंबित पावत्या देण्यात याव्यात अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम यांनी राज्याचे मुख्यमंत्री आणि शालेय शिक्षण मंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

याबाबत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की राज्यातील सरकारी निमसरकारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी भविष्य निर्वाह निधीमधे दरमहा गुंतवणूक करत असतात. दरवर्षी कर्मचारी शिक्षकांच्या गुंतवणूकीचा हिशेब देणा-या पावत्या दिल्या जातात. मुलांची लग्ने, आजारपण व तत्सम कारणांसाठी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी या खात्यामधून परतावा/ नापरतावा पध्दतीने रक्कम उचलत असतात. परंतु गेली तीन वर्षांपासून राज्यातील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी पावत्या देण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे आपल्या भविष्य निर्वाह निधी खात्यात किती रक्कम जमा आहे याबद्दल राज्यातील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी अनभिज्ञ आहेत. आवश्यक कारणांसाठी रक्कम काढण्यात त्यांना अडचणी येत आहेत. त्यामुळे त्यांच्यामधे असंतोष आणि नाराजी निर्माण झाली आहे. याची दखल घेऊन राज्यातील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या तीन वर्षांपासून प्रलंबित भविष्य निर्वाह निधी पावत्या देण्यात याव्यात अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव, सरचिटणीस राजकुमार कदम, कोषाध्यक्ष ए. बी. औताडे, उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे, जिल्हाध्यक्ष व्यंकटराव चिलवरवार, आर. के.वाकोडे, जी.पी कौसल्ये, ई.डी पाटोदेकर, डी.बी.नाईक, विजय लक्ष्मी स्वामी, आनंद मोरे, आर.पी वाघमारे, गणेश बडूरे, शे. हसीब, राम येडते, विनोद भुताळे, शिवानंद स्वामी, मनमत मठपती, मोहन पिनाटे, वसंत माने, घाटे सर यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# प्रा.डॉ. प्रज्ञाकुमार गाथाडे यांच्या इंडियन एज्युकेशन फॅक्टरी या ग्रंथाचे २६ रोजी प्रकाशन

लातूर / प्रतिनिधी- लातूरचे सुपुत्र प्रा.डॉ.प्रज्ञाकुमार गाथाडे यांनी लिहलेल्या इंडियन एज्युकेशन फॅक्टरी या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा मंगळवार दिनांक २६ मार्च२०२४ रोजी सायंकाळी ४:३० वाजता भालचंद्र ब्लड बँकेच्या सभागृहामध्ये होत आहे. डॉ. गाथाडे हे लातूरच्या ज्ञानेश्वर विद्यालय,महात्मा बसवेश्वर कॉलेज, शाहू महाविद्यालयाचे विद्यार्थी असून कोकणात वरिष्ठ महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.




यापूर्वी त्यांचे गावठाण, बिरसा मुंडा, वैभव संपन्न दोडामार्ग, हिश्र पुस्तक प्रसिद्ध झाली असून. गावठाणला अनेक पुरस्कार मिळाले आहेत.मुंबई विद्यापीठाच्या अभ्यासक्रमानुसारही त्यांनी अनेक पुस्तकांचे लिखाण केले आहे. इंडियन एज्युकेशन फॅक्टरी हा ग्रंथ शिक्षण क्षेत्रावर आधारित असून, प्रत्येक कालखंडानुसार शिक्षणात झालेले बदल, त्यातील वृत्ती प्रवृत्तीचा आढावा घेऊन,देश विदेशातील शिक्षणाबरोबरच भारतातील शिक्षण व्यवस्था कशी होती.आज तिचे चित्र काय आहे.आजच्या शिक्षण क्षेत्राला आलेले बाजारु स्वरूप, वेगवेगळ्या समाज घटकातील शिक्षणातील विदारक चित्र मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

महाराष्ट्रातील नामवंत शिक्षण तज्ञ व विचारवंत माजी प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे, लातूरचे गटशिक्षणाधिकारी निवृत्ती जाधव ,सामाजिक कार्यकर्ते माधव बावगे, डी.एस. गायकवाड, यांच्या उपस्थितीत या ग्रंथाचे प्रकाशन होणार असून ज्ञानप्रकाश ग्रंथालय, अंनिस, छात्रभारती यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी जास्तीत जास्त साहित्य प्रेमींनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन.डॉ. शिवाजी जवळगेकर,प्रा देवदत्त सावंत,भारत सातपुते,संभाजी बोडके, संजय जमदाडे,संजय घाडगे, रामदास कांबळे, महेंद्र गांधले,नारायण कांबळे, रमेश सोनवणे, निवृत्ती गाथाडे यांनी केले आहे.

# मुखेड येथे काँग्रेस पदाधिकाऱ्यांची बैठक व सत्कार

देगलूर(प्रतिनीधी):आज मुखेड येथे मुखेड कंधार विधानसभा मतदार संघातर्फे नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीचे समन्वयक माजी आमदार वसंतराव पाटील चव्हाण व नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीचे नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष माजी आमदार हनमंतराव पाटील बेटमोगरेकर यांचा सत्कार करून बैठक घेण्यात आली.

यावेळी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अण्णासाहेब जहिरे व आभार शहराध्यक्ष हणमंत नारनाळीकर यांनी केले .

काँग्रेस पक्षाची विचारधारा जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी महत्त्वाच्या पदाधिकाऱ्यांनी भाषणे केली यावेळी प्रदेश सचिव डॉ. श्रावण रॅपनवाड,तालुकाध्यक्ष राजू पाटील रावणगावकर,राजेंद्र देशपांडे,लेबर फेडरेशनचे संचालक शौकत पठाण,शिवाजी पाटील बेळीकर,काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते दिलीप सावकार कोडगिरे,दशिवाजी पाटील बेळीकर,ज्येष्ठ नेते माधवराव पाटील उंदरीकर,शिवलिंग पाटील कामजळगेकर,व इतर पदाधिकाऱ्यांनी काँग्रेस पक्षाच्या एकनिष्ठ कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी युवा नेते रवींद्र पाटील चव्हाण, शिवाजी पाटील पाचपिपळीकर, दिलीप पांढरे,बाळासाहेब गोमारे(म. जि.प.सदय), लालबा पाटील शिंदे दिग्रसकर, देवीदास कारभारी,संतोष बोनलेवाड, डॉ. रणजीत काळे, पत्रे ताई,संभाजी पाटील उंद्रिकर,व्यंकटराव पाटील पैसमाळ,पोले माजी सरपंच पैसमाळ,बिरबल नाईक मांजरी, विलास इमडे, दत्तू सावकार चोधरी, बाबू सावकार रावूत, शिवाजी पाटील खैरका,विजय पाटील तारड,जे. टी.भांगारे, दिगंबर सोमवारे, अच्युतराव पाटील, राम पाटील मंडलापूरकर, पांडुरंग खंदारे,रमेश आमनर, सुरेश पाटील बेळीकर, वेंकट दबडे, बालाजी पाटील कर्णा, नवसाजी पाटील खैरका,श्रीकांत पाटील मंग्याळकर, जयराम गवते, वसंत पाटील येवतीकर, अनिल कोल्हे, दिनेश आवडके, संदीप पाटील, वसंत पाटील वडगाव,आलडवाड गुरुजी,सुनील आरगिळे,अखील येवतिकर, संदीप घाटे तुपदाळकर(सरपंच),जब्बार चांडोळकर,गणेश स्वामी,सुरेश कल्लाळीकर, दिलीप पाटील कुंद्राळकर, अरुण जोगदंड, संजय नुकुलवार,सद्दाम सलगरकर,विशाल गायकवाड, अविनाश काळे,जयप्रकाश कांनगुले,रमण कुंनके,बालाजी वारे,नामदेव पाटील येलूर, जीलानी पटेल,हावगीराव पाटील नंदगाव, धनराज पाटील बेटमोगरा, जगु पाटील, नंदगाव, सुभाष पाटील पाळेकर,बालाजी पाटील भिसे, गंगाधर पाटील एकलारकर, उमाकांत पाटील माकणी, दुर्योधन पाटील जाहुरकर, हाके चांडोळकर, माधवराव देवक्कते माजी सरपंच चांडोळ, बालाजी पाटील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# देगलूर स्वीप कक्षाद्वारे रांगोळी स्पर्धेतून मतदान जागृती

देगलूर (प्रतिनीधी):- लोकसभा सार्वत्रिक २०२४ मध्ये मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी देगलूर स्वीप कक्षातर्फे विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. सहा. निवडणूक निर्णय अधिकारी सचिन गिरी , अतिरिक्त सहा. निवडणुक निर्णय अधिकारी तथा देगलूरचे तहसीलदार राजाभाऊ कदम , अतिरिक सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी श्रीकांत निळे यांच्या मार्गदर्शनाखाली मतदान जनजागृतीचे कार्य सुरू करण्यात आले आहे. तहसील कार्यालयातील स्वीप कक्षाच्या वतीने शिवाजी व सनराईज इंग्लिश स्कूल , देगलूर येथे मतदार जनजागृतीला प्रोत्साहन देण्यासाठी लहान मुलामुलींच्या मदतीने भव्य अशी रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली.

प्रस्तुत रांगोळी स्पर्धेच्या माध्यमातून लहान मुला मुलींनी भारतीय लोकशाही , भारताचे संविधान, मतदानाचा हक्क व कर्तव्य तसेच मतदानाचे प्रमाण वाढविण्याचा संदेश या रांगोळीच्या माध्यमातून दिला आहे. याप्रसंगी डॉ. बालाजी कतुरवार डॉ. संतोष येरावार , डॉ. अभिमन्यू पाटील डॉ. संजय देबडे आणि डॉ. नीरज़ उपलंचवार यांच्यासह मुख्याध्यापक वेंकट नरवाडे आदी उपस्थित होते.

# वै.धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालयातील खेळाडूंची विद्यापीठ संघात निवड

देगलूर (प्रतिनिधी) : अखिल भारतीय स्तरावरील आंतर विद्यापीठीय बॉल बॅडमिंटन मुलीची स्पर्धा अण्णा विद्यापीठ पासना इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी कॉलेज डींडीगुल चेन्नई येथे २१ ते २४ मार्च २०२४ या कालावधीत संपन्न होणार आहेत. या स्पर्धे साठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड च्या वतीने वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालयातील कु. मनीषा चुकुडवाड, कु. शेख सना अलीसाब, कु. जाधव वैष्णवी या तीन खेळाडूंची निवड झालेली आहे. संघ प्रशिक्षक डॉ. दिलीप भडके यांच्या नेतृत्वाखाली मुलींचा हा संघ आंतर विद्यापीठीय स्पर्धेसाठी १९ मार्च २४ रोजी विद्यापीठाच्या वतीने चेन्नईकडे रवाना झाला. या यशाबद्दल मुक्ताई प्रतिष्ठानचे सचिव राजेश महाराज देगलूरकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी, उपप्राचार्य तथा प्रशिक्षक व क्रीडा संचालक डॉ. दिलीप भडके, उपप्राचार्य प्रा. संजय अवधाने, महाविद्यालय क्रीडा समिती सदस्य डॉ. सौ. नेरकर संजिवनी, डॉ. भीमराव माळगे, डॉ. अभिमन्यु पाटील, मुख्य लिपिक धनंजय देशपांडे यांनी अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

**Name Change**

Old Name -- SYED JAFARBEGUM PASHA
New Name-- JAFAR BEGUM PIRPASHA
Address-- SYED CHAND DARGA NIDEBAN VES,
UDGIR DIST LATUR

**वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत**

मा.के.ए.पोवार,२रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर ,उदगीर यांचे न्यायालयासमोर
दिवाणी किरकोळअर्ज क्र.२२२/२०२४
निशाणी क्र.०७
ज्याअर्थी नामे Digambar Ishwar Biradar Kamlabai Digambar Biradar हे R/0 Tipral tq.Shiru -nantpal Dist Latur दि. ०६/११/ २०२२ -पव २२/०८/२०२० रोजी Tipral tq.Shiru -nantpal Dist Latur येथे मयत झाले आहेत. व अर्जदार
1) Sangram S/o Digambar Biradar -ge--55,Occ.--gri
Tipral tq.Shiru -nantpal Dist Latur
2) Navnath Digambar Biradar -ge--45,
3) Ishwar Digambar Biradar -ge-42
4) -rchana W/o Ganesh Doke -ge-40 -Occu--gri

खालिल नमुद चार व्यक्ती हे मयताचे वारस असुन
1) Sangram S/o Digambar Biradar -ge--55,--Son
2) Navnath Digambar Biradar -ge--45,--Son
3) Ishwar Digambar Biradar -ge-42,--Son
4) -rchana W/o Ganesh Doke -ge-40,--Daughter
अर्जदार यांनी Digambar Ishwar Biradar Kamlabai Digambar Biradar या नावाचे त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकिय व निमशासकिय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात, आणी ह्या लेखावरुन असे कळवण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्कात लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू ऊळसरालरी खीहुरी इळीरवरी घराश्ररलरळ ऊळसरालरी इळीरवरी यांचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांका१८/०३/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढुल तारीख:-२९/०४/२०२४

(के.डी. सीर्यवंशी )
कनिष्ठ लिपीक
२रे सह दिवाणी न्यायालय
क. स्तर,उदगीर

**आदेशावरुन**
(एस.एम.शेटे)
सहाय्यक अधिक्षक
सहदिवाणी न्यायालय
क.स्तर,उदगीर

**वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा**

मा. बी. आर. झेंडे, ४ थे दिवाणी न्यायाधीश क. स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर
दिवाणी किरकोळ अर्ज का. २१२/२०२४
निशाणी क्रमांक ०७
ज्याअर्थी नामे Vishwanth Sangappa Upparbawade हे दिनांक २२/११/२०१९ रोजी Havagiswami Galli ,Udgit Tal- Udgit, Dist-Latur येथे मयत झाले आहेत व अर्जदार

1) Sharanappa Vishwanth Upparbawade , -ge --78 yrs. Occu. Farmer ,
2) Shuresh Vishwanth Upparbawade , -ge --55 yrs. Occu. Farmer,
3) Mangalbai Shankarappa Upparbawade -ge --76 yrs. Occu. Household,
4) Ratish Shankarappa Upparbawade -ge --40 yrs. Occu.--Farmer,
-pplicant R/o Havagiswami Galli ,Udgit Tal- Udgit, Dist-Latur
यांनी खालील नमुद (४) चार व्यती हे मयताचे उत्तराधिकारी असून,

) Sharanappa Vishwanth Upparbawade , -ge --78 yrs.,--Son ,
2) Shuresh Vishwanth Upparbawade , -ge --55 yrs.,--Son
3) Mangalbai Shankarappa Upparbawade -ge --76 yrs.,--Daughter
4) Ratish Shankarappa Upparbawade -ge --40 yrs.,--Grandson

अर्जदार यांने Vishwanth Sangappa Upparbawade या मयताचे वारस असल्याबाबतचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.
त्याअर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती दाखविल्या तर सदरहू
कोर्ट सदरहू अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याना सदरहू Vishwanth Sangappa Upparbawade याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी,
आज दिनांक १८/०३/२०२४ रोजी साझे सहीनिशी व मां न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढील तारीख १५/०४/२०२४

( ए. बी. सुर्यवंशी)
कनिष्ठ लिपीक
सह दिवाणी न्यायालय
क. स्तर, उदगीर

आदेशावरुन
(एस.एम. शेटे)
(सहाय्यक अधिक्षक)
सह दिवाणी न्यायालय क. स्तर, उदगीर






# लातूर ग्रामीण विधानसभा भाजपा भटक्या विमुक्त आघाडी संयोजक पदी श्याम भोळे

लातूर दि.२० - भारतीय जनता पार्टीच्या भटक्या विमुक्त आघाडी लातूर ग्रामीण विधानसभा संयोजक पदी लातूर तालुक्यातील मौजे कानडी बोरगाव येथील श्याम नामदेव भोळे यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांना भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील गावागावात वाडी वस्तीत प्रत्येक बूथ स्तरावर भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या नेतृत्वाखाली भाजपा पक्षाचे मजबूत संघटन करण्यात येत आहे. पक्षाच्या विविध आघाडी आणि मोर्चाची सक्षम कार्यकारिणी कार्यरत असून लातूर ग्रामीण विधानसभा भटक्या विमुक्त आघाडीच्या संयोजक पदी श्याम नामदेव भोळे यांची नियुक्ती करून आ. रमेशअप्पा कराड यांनी शासनाच्या विविध योजनेचा भटक्या विमुक्तांना लाभ द्यावा त्याचबरोबर मतदार संघात या आघाडीची मजबूत बांधणी करावी अशा शुभेच्छा दिल्या.

लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात झालेल्या या नियुक्तीपत्र प्रदान कार्यक्रमास भाजपाचे शाम वाघमारे यांच्यासह भटक्या विमुक्त समाजातील भारत भोळे, अभिमन्यू हारगावकर, श्याम मंडकर, सतीश कारे, अमित शिंदे, आकाश काळे, भरत चौगुले, गोविंद राठोड, माऊली आरमाने, विलास कदम, रामदास मंडगर, गोविंद क्षिरसागर, अशोक कांदे, विकास मंडकर, अजय भोळे, शिवाजी घावीट यांच्यासह अनेक गावातील तरुण मोठ्या संख्येने होते.

## प्रा.विठ्ठल सोनकांबळे व संध्या वाघमारे गेट परीक्षा उत्तीर्ण

लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागातील प्रा.विठ्ठल संजीव सोनकांबळे व एम.एस्सी.रसायनशास्त्र द्वितीय वर्षातील संध्या वाघमारे ही विद्यार्थीनी आयआयटी गेट परीक्षेत उत्तीर्ण झालेले आहेत.त्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या हस्ते दोघांचाही सत्कार करण्यात आला.

त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड,रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ.युवराज सारणीकर,औद्योगिक रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. आण्णाराव चौगुले,डॉ.नंदिनी कोरडे,डॉ.जमन अंनगुलवार,डॉ. रवींद्र शिंदे,प्रा.राहुल जाधव,डॉ. रामशेट्टी शेटकार यांच्यासह सर्व विभाग प्रमुख,प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी सर्वांनी त्यांचे अभिनंदन व कौतुक केले आहे.

### पान १ वरून

### काँग्रेस महाराष्ट्रात...

विशेष म्हणजे वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांच्याबाबतचा निर्णय अद्याप झालेला नाही.

शिंदे

१८ उमेदवारांमध्ये २ महिला

काँग्रेसच्या या १८ उमेदवारांमध्ये २ महिला उमेदवारांचा समावेश आहे. चंद्रपूरमधून प्रतिभा धानोरकर आणि सोलापूरमधून प्रणिती शिंदे यांना उमेदवारी निश्चित झाली आहे. इतर नावांची यादी कदाचित उद्या पत्रकार परिषद घेऊन जाहीर केली जाऊ शकते.

निश्चित झालेले उमेदवार असे

पुणे – रवींद्र धंगेकर, गडचिरोली – नामदेव किरसंड, सोलापूर – प्रणिती शिंदे, नंदुरबार – गोवाल पाडवी, अमरावती – बळवंत वानखेडे, कोल्हापूर – शाहू महाराज छत्रपती, नागपूर– विकास ठाकरे.

### मुंबईत उष्णतेच्या...

कुलाबा येथे १.४ तर सांताक्रूझ येथे २.२ अंशांनी अधिक कमाल तापमान नोंदवले गेले. मुंबईच्या किमान तापमानामध्येही वाढ नोंदवली गेली असून कुलाबा येथे २३ तर सांताक्रूझ येथे २२.५ अंश सेल्सिअस किमान तापमान नोंदले गेले.

मध्य महाराष्ट्रात किमान तापमान तुरळक ठिकाणी १६ ते १७ अंशांदरम्यान आहे. मात्र कमाल तापमानाचा पारा ३५ ते ३८ अंशांदरम्यान पोहोचला आहे. जळगाव येथे ३६.७, जेऊर येथे ३७.५, कोल्हापूर येथे ३६.१, सांगली येथे ३७.२, सोलापूर येथे ३८.४ याप्रकारे कमाल तापमान मंगळवारी नोंदवले गेले. हे तापमान आत्ताच्या सरासरीच्या आसपास आहे.

### जाहिरातबाजीवर...

३०.९ कोटी रुपये खर्च केले आहेत. या कालावधीत काँग्रेसने केवळ १८.८ लाख रुपये खर्च केले आहेत. एकूण रकमेपैकी ८६.४ टक्के रक्कम व्हिडिओ जाहिरातींवर खर्च करण्यात आली आहे. उर्वरित १३.६ टक्के फोटो फॉरमॅटमधील जाहिरातींवर खर्च करण्यात आला आहे.

अगोदरपासूनच निवडणूक तयारी

२०२४ चा जानेवारी महिना उजाडला, त्याच्या अगोदरपासून लोकसभा निवडणुकीची वातावरण निर्मिती सुरू झाली. सत्ताधारी भाजपने तर वेगवेगळ्या इव्हंटच्या माध्यमातून अधिक जोर लावला. त्यात विरोधी पक्षही मागे राहिले नाहीत. विविध ठिकाणी जाहीर कार्यक्रम घेतानाच ऑनलाईन जाहिरातीसाठी गूगलची मदत घेण्यात आली. त्यामुळे गूगलवरील जाहिरातीचा खर्च अनेक पटींनी वाढला आहे.

### परिवहनच्या...

प्रायोगिक तत्वावर हा प्रयोग केला जाणार आहे, अत्याधुनिक स्वरुपाचे हे शौचालय उभारले जाणार आहे. या शौचालयांचा वापर केवळ महिलांसाठीच करता येणार आहे. एका बसमध्ये पाच सीट्स असणार असून दोन बसमध्ये १० सीट्स असणार आहेत. यापूर्वी पूण्यात हा प्रयोग करण्यात आला होता. त्याच धर्तीवर आता ठाणे महापालिकेने हा प्रयोग हाती घेण्यात आला आहे.

### काळा पैसा...

कुठे जाणार होता? हे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी देशातील जनतेला सांगू शकतील का? एवढेच नाही, तर त्यांच्या खासदाराच्या घरातून जप्त करण्यात आलेले ३५५ कोटी रुपये कुणाचे आहेत? याचे उत्तरही त्यांनी द्यायला हवे, असेही शहा यावेळी म्हणाले.

केंद्र सरकारने नागरिकत्व सुधारणा कायदा (सीएए) लागू केल्यानंतर विरोधक सातत्याने सरकारवर टीका करत आहेत. तसेच, या कायद्याला मुस्लिमविरोधी कायदा असल्याचे सांगितले जात आहे. पण, या कायद्याद्वारे कोणाचेही नागरिकत्व हिरावून घेतले जाणार नाही, असे सरकारकडूनही वारंवार सांगितले जात आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पुन्हा एकदा याचा पुन्नरुच्चार केला. अमित शहा पुढे म्हणाले की, सीएए मंजुर झाल्यानंतर देशात मोठा गैरसमज पसरला. जेव्हा सत्याबद्दल गैरसमज पसरवले जातात, तेव्हा सत्य लोकांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी सत्तेत असलेल्या पक्षाची असते. विरोधकांनी मुस्लिम समाजाची दिशाभूल केली. सीएएमुळे मुस्लिमांचे नागरिकत्व जाणार, त्यांचा मतदानाचा अधिकार हिरावून घेतला जाईल, असा गैरसमज विरोधकांनी पसरवला. पण, देशातील मुस्लिमांना घाबरण्याची अजिबात गरज नाही. सीएए हा नागरिकत्व घेण्यासाठी नसून, तो निर्वासितांना नागरिकत्व देण्याचा कायदा आहे.

### राष्ट्रवादीच्या...

संवादात श्रीनिवास पवारांनी अजित पवारांवर जोरदार टीका केली. त्यानंतर माध्यमांमध्ये हा व्हिडिओ समोर आला. तेव्हापासून बारामतीत अजित पवारांचे कार्यकर्ते आणि शरद पवारांचे कार्यकर्ते यांच्यात कुरघोडी सुरू असल्याचे बोलले जाते.

### चारा टंचाईतहि...

गट, लालकंधारी गाभण कालवड गट,लालकंधारी गाभण गाय गट, लालकंधारी गाय दुधाळ गट,संकरित मादी गटातून संकरित मादी एक वर्षा खालील वासरे गट, संकरित कालवड एक वर्षावरील गट,संकरित गाभण गाय गट,संकरित गाय दुधाळ गट तर म्हैस गटातून नर व मादी अशा दोन गटातील जवळपास दिडशे पशु या प्रदर्शनात सहभागी झाले होते.

अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निवड समितीने प्रदर्शनातील उत्कृष्ट पशुंची निवड केली. प्रत्येक गटातील पशुधनास प्रथम,द्वितीय तृतीय तसेच अ,ब,क,ड याप्रमाणे बक्षिसांचे वाटप करण्यात आले.बक्षिसाची रक्कम आरटीजीएसद्वारे संबंधित पशुपालकाच्या खात्यावर वर्ग करण्यात आली.

### लोकसभा...

बिदर जिल्ह्यात तिसऱ्या टप्प्यात मतदान होणार आहे. दोन्ही जिल्ह्यात निवडणूक काळात गैरप्रकार होवू नयेत, निवडणूक प्रक्रिया शांततामय वातावरणात पार पाडण्यासाठी सीमाभागात दोन्ही जिल्हा प्रशासनामार्फत संयुक्तपणे उपाययोजान करणे आवश्यक आहे. लातूर जिल्हा प्रशासन आणि पोलीस प्रशासनाने विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरु केल्या आहेत. सीमाभागात या उपाययोजना राबविण्यासाठी दोन्ही जिल्ह्यातील प्रशासनाने एकत्रितपणे कार्यवाही केल्यास अधिक परिणामकारक ठरेल, असे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यावेळी म्हणाल्या.

कर्नाटक राज्यात झालेल्या विधानसभा निवडणूक काळात बिदर जिल्ह्याच्या सीमावर्ती भागात निवडणूक प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी लातूर जिल्हा प्रशासनाने मोलाचे सहकार्य केले होते. आता लोकसभा निवडणुकीत दोन्ही जिल्ह्यात एकाच वेळी तिसऱ्या टप्प्यात मतदान होणार असल्याने दोन्ही जिल्ह्यातील प्रशासनाच्या समन्वयातून निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी बिदर जिल्हा प्रशासनामार्फत सर्वो तपरी सहकार्य केले जाईल, असे बिदरचे जिल्हादंडाधिकारी गोविंद रेड्डी यांनी सांगितले. तसेच बिदर जिल्हा प्रशासनाच्यावतीने सीमाभागात करण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती त्यांनी दिली.

आगामी काळात सीमाभागात संयुक्तपणे प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यासाठी बिदर पोलीस दलाची मदत घेतली जाईल. त्यामुळे दोन्ही जिल्ह्यातील सीमाभागातील अवैध कृत्यांना प्रतिबंध करणे शक्य होईल, असे लातूरचे पोलीस अधीक्षक श्री. मुंडे म्हणाले.

लातूरचे उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. कदम आणि अपर पोलीस अधीक्षक श्री. देवरे यांनी लातूर जिल्हा प्रशासन आणि पोलीस प्रशासनामार्फत सीमाभागात करण्यात आलेल्या उपाययोजना, तसेच या अनुषंगाने बिदर जिल्हा प्रशासन, पोलीस यांच्याकडून अपेक्षित सहकार्य याबाबत माहिती दिली.

---

**नावात बदल जाहिरात**

Name Change

Old Name -- SYED JAFARBEGUM PASHA
New Name-- JAFAR BEGUM PIRPASHA
Address-- SYED CHAND DARGA NIDEBAN VES, UDGIR DIST LATUR

---

## वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.जे.सी.गुप्ता.सहदिवाणी न्यायाधिश क.स्तर उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २२९/२०२४

निशाणी क्र.०७

ज्याअर्थी नामे Sushilabai W/o Vyankat More हे दि.१८/१२/२०२३ रोजी Nideban, Udgir Tq. Udgir Dist .Latur Udgir येथे मयत झाले आहेत व अर्जदार

Sanjay S/o Vyankat More age-55 ,Occu--Service

R/o - Vikas Nagar Nideban, Udgir Tq. Udgir Dist .Latur

यांनी खालील नमुद दोन व्यक्ती हे मयताचे वारस असुन

1) Sanjay S/o Vyankat More age-55 ,--Son

-अर्जदार याने Sushilabai W/o Vyankat More या मयताचे वारस असल्याबाबतचे वारसाचे प्रमाणपत्र शासकिय व निमशासकिय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात, आणी ह्या लेखावरुन असे कळवण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्कात लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Sushilabai W/o Vyankat More यांचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांका १९/०३/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख:-२५/०४/२०२४

(संतोष डी.शिंदे)
कनिष्ठ लिपीक
सह दिवाणी न्यायालय
क. स्तर,उदगीर

आदेशावरुन
(एस.एम. शेटे)
सहाय्यक अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय
क. स्तर,उदगीर

---

## वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.जे.सी.गुप्ता.सहदिवाणी न्यायाधिश क.स्तर उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २२५/२०२४

निशाणी क्र.०७

ज्याअर्थी नामे Saraswati W/o Pandharinath Suryawanshi हे दि.१२/०४/२०२३ रोजी छ्रश्रशसरेप ठेरव णवसळी Tq.Udgir Dist .Latur येथे मयत झाले आहेत व अर्जदार

Shivanand S/o Pandharinath Suryawanshi age-71 ,Occu--Business,

R/o - Nalegaon Road Udgir Tq.Udgir Dist .Latur

यांनी खालील नमुद दोन व्यक्ती हे मयताचे वारस असुन

1) Shivanand S/o Pandharinath Suryawanshi age-56, -- Son

2) Dayanand S/o Pandharinath Suryawanshi age-59, -- Son

-अर्जदार याने डरीरुरींळ थ/ झरपवहरीळपरींह डींरुरपीहळ या मयताचे वारस असल्याबाबतचे वारसाचे प्रमाणपत्र शासकिय व निमशासकिय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात, आणी ह्या लेखावरुन असे कळवण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्कात लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Saraswati W/o Pandharinath Suryawanshi यांचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांका २०/०३/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख:-३०/०४/२०२४

(संतोष डी.शिंदे)
कनिष्ठ लिपीक
सह दिवाणी न्यायालय
क. स्तर,उदगीर

आदेशावरुन
(एस.एम. शेटे)
सहाय्यक अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय
क. स्तर,उदगीर

---

**जाहीरनामा**

**रेणापुर येथील दिवाणी न्यायाधिश क.स्तर रेणापुर यांचे कोर्टात**

**कोर्टाचा शिक्का**

**दिवाणी किरकोळ अर्ज नंबर ६५/२०२४**
**सारजाबाई व इतर ५ वि.निरंक**
**निशाणी क.**

**वारसाचे सर्टिफिकेटबद्दल**

ज्यापेक्षा मयत प्रल्हाद नामदेव नरवटे, रा. काळेवाडी ता. रेणापूर जि. लातूर हे दि. ०४/०१/२०२४ रोजी काळेवाडी ता. रेणापूर जि. लातूर येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार सारजाबाई भ्र. प्रल्हाद नरवटे, रा. काळेवाडी ता. रेणापूर जि. लातूर हयांनी हया कोर्टास सदरहू मयताचे वारस खालील अर्जदार

१. सारजाबाई भ्र. प्रल्हाद नरवटे, वय ८० वर्षे, धंदा घरकाम,
२. राजकुमार पि. प्रल्हाद नरवटे, वय ५४ वर्षे, धंदा शेती,
३. अच्युत पि. बालासाहेब नरवटे, वय २७ वर्षे, धंदा शेती,
४. ज्योतीराम पि. बालासाहेब नरवटे, वय २९वर्षे, धंदा शेती, सर्व रा. काळेवाडी ता. रेणापूर जि. लातूर
५. संगिता भ्र. महादेव चव्हाण, वय ४६ वर्षे, धंदा घरकाम, रा. वाघाळा ता. अंबाजोगाई जि. बीड
६. कालिंदा मुकुंद इंदलकर, वय ४८ वर्षे, धंदा घरकाम, रा. नांदगाव ता. अंबाजोगाई जि. बीड

अर्जदार

यांनी सर्टिफिकेट मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू प्रल्हाद नामदेव नरवटे, यांचे वारस सर्टिफिकेट देईल.

तारीखः १९/०३/२०२४
पुढील तारीखः २४/०४/२०२४

**क. लिपिक**
**दि.न्या.क.स्तर, रेणापूर**

**सहायक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**क. स्तर रेणापूर**

---

**जाहीरनामा**

**२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर औसा यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांकः २२६/२०२४**
**नि.क.०६**
**प्रल्हाद/निरंक**

**वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत**

अर्जदाराचे नावः१. प्रल्हाद विश्वनाथ कांबळे, वय–५४ वर्षे, धंदा–शेती, इतर वारस–१. कस्तुरबाई विश्वनाथ कांबळे, २. शालुबाई उत्तम साखळे, ३. मंगल बापुराव वाघमारे ४. मुक्ताबाई अण्णासाहेब वाघमारे, ५. जयश्री बालाजी कांबळे, वरील सर्व रा. दावतपुर ता. औसा जि. लातूर ज्यापेक्षा मयत विश्वनाथ तुकाराम कांबळे हे दि. ०१/०२/२०२४ रोजी मयत झालेले आहेत. वरील अर्जदारांनी ह्या न्यायालयात सदरहू मयत यांच्या पश्चात शासकीय व निमशासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. मा. न्यायालयाचे वारसाचे प्रमाणपत्र मिळणेसाठी वरील अर्जदारांनी अर्ज केला आहे.

त्यापेक्षा वरील अर्जदार हे मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय सदरहू अर्जदार ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे वारसाचे/ वारसहक्काचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

पुढील दि. २३/०४/२०२४

**बोरफळे एस.पी.**
**क.लिपीक**

**आदेशावरुन,**
**सहा.अधिक्षक,**
**दिवाणी न्यायालय**
**क.स्तर, औसा जि. लातूर**

---

## ग्रामपंचायत कार्यालय, श्याम नगर १२ नं. पाटी ता. जि. लातूर.

### जाहिर प्रगटन

मौजे श्याम नगर १२ नं. पाटी ता. जि. लातूर येथील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, .शिवराज उत्तम जाधव रा. खेड ता. लोहारा जि. उस्मानाबाद यांची जागा / घर नोंदणी बाबतचा अर्ज व रजिस्ट्री नक्कल ग्रामपंचायतला दि. २४/३/२०२३ रोजी खतविण्यासाठी नावे करण्यासाठी प्राप्त झाले आहे.

रजि. क्र. ३१४०/२०२३ दि.२०.०३.२०२४

सदर जागेची / घराची चुतःसिमा पुढील प्रमाणे आहे.

पु.– ६ मीटर रुंदीचा रस्ता प. प्लॉट नंबर १/२२

द.– प्लॉट नंबर १/१८ उ. ६ मीटर रुंदीचा रस्ता

| गट. नं. | जागेची साईज | खरेदीदाराचे नाव | विक्रीदाराचे नाव |
|---|---|---|---|
| ३१३/ १ पैकी प्लॉट नं. १/१९ | पु.प.१०.७० मी. द.उ. १२.२० मी. उ.बा. १२.८२ मी. एकूण क्षेत्रफळ १३३.८५चौ. मीटर | **शिवराज उत्तम जाधव** | **सरस्वती गंगराम मुदामे.** |

किंमत १,४५, ००० :– सदर आतील जागेची नोंद करण्याबाबत कोणाचा आक्षेप / विरोध असेल तर हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून (७) दिवसाच्या आत ग्रा. पं. लेखी तक्रार अर्ज करावा. मुदतीनंतर काही तक्रार आल्यास अशा तक्रारी अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरीत :–**
**ग्रामसेवक/सरपंच**

---


**सुर्य कल्याण मुंबई रात्र**

स्पेशल ४५/७८

| | | |
|---|---|---|
| ५ | ८ | ९ |
| १४० | ३७८ | ४५० |
| ५२–५७ | ८०–८५ | ९१–९६ |

**प्रो. दिपक कुमार**

स्पेशल चान्ससाठी मेंबरशिप नोंदणी चालू आहे. संपर्क साधावा.

१००% चान्स पास होणार



**गोल्डन विकली चान्सेस**

मिलन (उदय/अस्त)(शनिवार)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | ३९० | ६ | २४० | ० | १४५ |
| | ४८० | | २६८ | | २३५ |
| | २२८ | | ३३० | | ५५० |
| | ९२–२१ | ३६–६७ | | ८०–०४ | |

कल्याण(उदय/अस्त)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | १३९ | १ | १४६ | ८ | १२५ |
| | २३८ | | ४७० | | २६० |
| | ६७० | | १०० | | ४४० |
| | ९३–३२ | ०१–१४ | | ७८–८६ | |

ता.२७ व २९ चे जबरदस्त चान्ससाठी

**संपर्क करा**

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारी आहे. कृपया दुरुपयोग करु नये.

मोबा–९९७५४७९८२६



**नशिबाची परिक्षा**

गोल्डन विक्री चान्सेस

**मिलनम डे**

कल्याणम

| उदय–अस्त | | सिंगल:९–५–७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ७–४ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

**कल्याणम**

| उदय–अस्त | | सिंगल:०–३–७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ०–४ | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

**मुंबैम (मेन)**

| उदय–अस्त | | सिंगल:७–१–४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ७–० | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

दिवाळी बंपर चालू आहे 99 75 47 98 26

## दुकान भाडयाने देणे आहे

शिवाजी चौक देगलूर रोड उदगीर १८ x ६५ ची ३ मजली ईमारत भाडयाने देणे आहे.

संपर्क
शिवशंकर नागठाणे
मो.नं. ९८९०७१८५०५
मो.नं. ८३८०८३५५७५
मो.नं. ८६००१८६५५८

# यशवंत

गुरुवार दि. २१ मार्च २०२४

पान ८

# उदगीर

कार्यालय :०२३८५-२५३९९८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com



**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**

**शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७**

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)

दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**

वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग


## डॉ. आंबेडकर सार्वजनिक जयंती महोत्सव समिती उदगीरच्या अध्यक्षपदी संजय बनसोडे

उदगीर /प्रतिनिधी- उदगीर विश्वरत्न परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या सार्वजनिक जयंती महोत्सव समितीची बैठक नालंदा बुद्ध विहार येथे १८ मार्च २०२४ रोजी पार पडली

विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी सार्वजनिक जयंती महोत्सव समितीची नूतन कार्यकारणी जाहीर करण्यासाठी नालंदा बुद्ध विहार उदगीर येथील तमाम आंबेडकर प्रेमी जनतेची व समाज बांधवांची विशाल अशी बैठक देविदास कांबळे यांच्या

अध्यक्षतेखाली घेण्यात आली यावेळी अध्यक्षपदी संजय बनसोडे तर कार्याध्यक्षपदी देविदास कांबळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली या बैठकीला प्रमुख उपस्थिती भन्ते नागसेन बोधी माजी उपनगराध्यक्ष फयजूखा पठाण, माजी नगरसेवक विलास शिंदे माजी नगरसेवक व्यंकट बोईनवाड मदन मदन तुळजापुरे नरसिंग शिंदे दिलीप कांबळे शशिकांत बनसोडे अनिल मुधाळे मुढाळे अडवोकेट प्रफुल्ल कुमार उदगीरकर शिवमूर्ती उमरगेकर अनिल सोमवंशी संघशक्ती बलांडे उमाकांत बनसोडे सागर सोनकांबळे गोविंद सोमवंशी नितीन गायकवाड पप्पू कांबळे सूर्यभान कांबळे अजय पारखे बाबा सूर्यवंशी दयानंद शिंदे अविनाश गायकवाड पिंटू सुतार नामदेव बामणे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सवाचे अध्यक्ष जितेंद्र बनसोडे यांची दयानंद कला महाविद्यालयास सदिच्छा भेट

लातूर:दिनांक २० रोजी श्री. जितेंद्र बनसोडे यांची विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर १३३ वी जयंती उत्सव समिती लातूर शहराच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी त्यांचे शाल, पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी जितेंद्र बनसोडे यांनी असे प्रतिपादन केले की, आज दयानंद कला महाविद्यालयाकडून सत्कार स्विकारतांना मनस्वी आनंद होत आहे. ज्या महाविद्यालयातून आयुष्याची सुरुवात झाली. तेथील गुरुजनांचा पाठीवर आर्शिवाद म्हणजेच आपण आज केलेला सन्मान असे त्यांनी गौरवद्गार काढले. आणि सत्काराबद्दल मन:पुर्वक धन्यवाद आणि मनस्वी आनंद ही होतोय असे मत व्यक्त केले. याच बरोबर प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या नेतृत्वात दयानंद कला महाविद्यालयाचा विकास आणि वाढ उत्तम प्रकारे होत आहे. आणि ज्या महाविद्यालयातून शिक्षणाची शिदोरी घेऊन मी माझ्या जीवनाची वाटचाल करत असताना आपल्या अमूल्य सत्कारामुळे मी भारावून गेलो आहे. असे या सत्कार प्रसंगी मत व्यक्त केले.

यावेळी सोबत महात्मा बसेश्र्वर महाविद्यालय लातूर येथून इ. ११ वी व १२ वी पर्यंतचे शिक्षण पुर्ण केले. त्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गवई सर, प्रा.गोडबोले सर हे सोबत होते. त्यांचाही यथोचित सत्कार शाल श्रीफळ देऊन करण्यात आला. इतर सर्व समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. त्यांचाही सत्कार करण्यात आला.

या सत्कार प्रसंगी महाविद्यालयातील हिंदी विभाग प्रमुख प्रा. डॉ. प्रदीप सूर्यवंशी, प्रा. डॉ. अंकुशकुमार चव्हाण, उपप्राचार्य प्रा. अनिलकुमार माळी, पर्यवेक्षक प्रा.डॉ. दिलीप नागरगोजे, डॉ. अशोक वाघमारे, प्रा. सुरेश क्षीरसागर, प्रा. दशरथ ननवरे, डॉ. सुधीर गाडवे, श्री.बालकिशन अडसुळ, चंद्रकला आदमाने आणि सर्व कार्यालयीन कर्मचारी आदी उपस्थित होते.

# शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण तीन टप्प्यांमध्ये पुर्ण

**माधव होनराव**

जळकोट : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे , जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था मुरुड आणि गटसाधन केंद्र जळकोट यांच्यावतीने माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक वृद्धी प्रशिक्षण शहरातील जिल्हा परिषद प्रशाला जळकोट येथे आयोजित करण्यात आले होते. ता. २३,२४ व २५ फेब्रुवारीला पहिला टप्पा, ता. २७,२८ व २९ मार्च दुसरा टप्पा व ता. ११,१२ आणि १४ मार्च तिसरा टप्पा , अशा तीन टप्प्यांमध्ये हे प्रशिक्षण पूर्ण करण्यात आले.

या प्रशिक्षणात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० यातील या धोरणाची वैशिष्ट्य ध्येयधोरणे, राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, अंतर समवाय क्षेत्र, नाविन्यपूर्ण अध्यापन शास्त्र, २१ व्या शतकातील कौशल्य व भविष्यवेधी शिक्षण, व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन, कुमार अवस्थेतील मुले समजून घेताना ,शाळा आधारित व क्षमता आधारित मूल्यांकन, राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण, राज्य शैक्षणिक संपादक सर्वेक्षण, कार्यक्षमता प्रतवारी दर्शके, कार्यपद्धती व विश्लेषण, कृती संशोधन कार्यपद्धती व कृती संशोधन व उपक्रम माहिती तंत्रज्ञानाचा शिक्षणातील उपयोग , प्रभावी शैक्षणिक नेतृत्व आदी घटका विषयी सविस्तर मांडणी करण्यात आली.

या प्रशिक्षणाच्या उद्घाटनापासुन तिसऱ्या टप्प्याच्या समारोपापर्यंत जळकोट पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी जयसिंग जगताप, प्रशिक्षण समन्वयक देविदास केंद्रे,अर्जुन जाधव व सोनटक्के सर आदींनी परिश्रम घेतले. प्रशिक्षणा दरम्यान जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था मुरुड च्या प्राचार्या डॉ भागिरथी गिरी व त्यांच्या सहकाऱ्यांनी वेळोवेळी प्रशिक्षणाला भेटी दिल्या. हे सर्व टप्पे पंचायत समिती जळकोटचे गटशिक्षणाधिकारी जयसिंग जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणाचे नियोजन केले होते. तालुक्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी सुलभक म्हणून प्रा. माधव मरशिवणे, प्रा. सुर्यानंद जाधव , प्रा. माधव हासुळे, वनशेट्टे प्रकाश, नागनाथ खिंडे, माधव वाघमारे व पडीले सर आदिंचा समावेश होता. .या प्रशिक्षणाच्या तिन्ही टप्प्यात जवळपास १७५ माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले.

## राष्ट्रीय सेवा योजना युवा नेतृत्व निर्माणाची कार्यशाळा : लेफ्टनंट डॉ. साईनाथ उमाटे

**लातूर, / प्रतिनिधी -** भारताची सर्वात मोठी शक्ती आजचा युवक वर्ग आहे. युवकांच्या संवर्धनातून भारतीय राष्ट्राची एकात्मता आणि शक्ती संवर्धन होईल असे प्रतिपादन लेफ्टनंट डॉ. साईनाथ उमाटे यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड सलग्नित राष्ट्रीय सेवा योजना, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर आणि ग्रामपंचायत कार्यालय, जवळा बु. यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेचे वार्षिक विशेष युवक शिबिरातील बौद्धिक व्याख्यानात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून म्हणून बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. शिवप्रसाद डोंगरे हे होते. तर विचारपीठावर डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. मनोहर चपळे आणि प्रा. किसनाथ कुडके यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना लेफ्टनंट डॉ. साईनाथ उमाटे म्हणाले की, भारत देशाच्या सर्वांगीण विकासासाठी युवकांचे नेतृत्व आणि त्यांची कार्यक्षमता ही राष्ट्र यशाच्या उंच शिखरावर नेऊन ठेवण्यास कारणीभूत असते. आजचा युवक हा देशाचा कणा आहे. राष्ट्र उभारणीत युवकांचे महत्त्वाचे मोलाचे योगदान आहे. युवक हा राष्ट्राची संपत्ती आहे. राष्ट्राचे युवक हे बुद्धिमान, गतिमान, मूल्यवान व समाजशील असतात त्या राष्ट्राचा विकास गतिमान असतो. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप डॉ. शिवप्रसाद डोंगरे यांनी केला. सूत्रसंचालन कु. राखी इंगळे हिने केले तर आभार कु. वैष्णवी कांबळे हिने मानले. कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## येणकी , जकनाळ व नेत्रगाव भागात मतदान जनजागृती

उदगीर । तालुक्यातील व येणकी , जकनाळ व नेत्रगाव परिसरात मतदान जनजागृती मोहीम राबवण्यात आली . यामध्ये प्रामुख्याने येणकी , जकनाळ व नेत्रगाव परिसरात जिल्हा प्रशासनाच्या वतीने मतदारांना मतदान करण्याच्या संदर्भात प्रबोधन करण्यात आले . उदगीर तालुक्याच्या ग्रामीण भागात मतदान जनजागृती अभियान राबवण्यात आले . लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे , उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे , तहसीलदार राम बोरगावकर व मंडळ अधिकारी मोघा व्हि आर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासन मोहीम राबवत आहे . यावेळी बि एल ओ सि एस बिरादार , ए के पाटील, तलाठी जि डि इंगोले आणि नागरिक उपस्थित होते . गावातील दिव्यांग व्यक्ती आणि ८५ वर्षांच्या पुढे वय असलेल्या व्यक्तींना घरीच बॅलेट पेपर दिला जाणार आहे . पोस्टल मतदानाच्या पद्धतीनुसार त्यांना मतदान करता येणार आहे . त्यामुळे जास्तीत जास्त मतदारांनी आपला हक्क बजावला पाहिजे , अशी शासनाची भूमिका असून यासंदर्भात प्रशासनाने जनजागृती केली .

### प्रा.डॉ.बळीराम भुक्तरे यांना आयसीएसएसआर चा

## मेजर रिसर्च प्रोजेक्ट मंजूर

उदगीर-येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील हिंदी विभागप्रमुख प्रा.डॉ.बळीराम संभाजी भुक्तरे यांना इंडियन काउंसिल ऑफ सोशल साइंस रिसर्च यांच्यातर्फे दक्खिनी हिंदी भाषा साहित्य मे व्यक्त संस्कृती एवं समाज का अनुशीलन* या विषयावर बृहत शोध प्रकल्प (मेजर रिसर्च प्रोजेक्ट) मंजूर झाला आहे. त्याबद्दल महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन मानकरी, उपाध्यक्ष डॉ.रेखा रेड्डी, सचिव रामचंद्र तिरुके, सहसचिव ॲड.एस.टी.पाटील चिघळीकर आणि डॉ. रामप्रसाद लखोटिया, कोषाध्यक्ष भालचंद्र चाकूरकर तसेच सर्व संस्था सदस्य, प्राचार्य डॉ. आर.के.मस्के, उपप्राचार्य डॉ. एस.जी.पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत

### जाहिरनामा

मा.के.ए.पोवार,२रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर ,उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळअर्ज क्र.२२२/२०२४

निशाणी क्र.०७

ज्याअर्थी नामे Digambar Ishwar Biradar Kamlabai Digambar Biradar ho R/0 Tipral tq.Shiru -nantpal Dist Latur दि. ०६/११/ २०२२ -पव २२/०८/२०२० रोजी Tipral tq.Shiru -nantpal Dist Latur येथे मयत झाले आहेत. व अर्जदार

1) Sangram S/o Digambar Biradar -ge--55,Occ.--gri Tipral tq.Shiru -nantpal Dist Latur
2) Navnath Digambar Biradar -ge--45,
3) Ishwar Digambar Biradar -ge-42
4) -rchana W/o Ganesh Doke -ge-40 -Occu--gri

खालिल नमुद चार व्यक्ती हे मयताचे वारस असुन

1) Sangram S/o Digambar Biradar -ge--55,--Son
2) Navnath Digambar Biradar -ge--45,--Son
3) Ishwar Digambar Biradar -ge-42,--Son
4) -rchana W/o Ganesh Doke -ge-40,--Daughter

अर्जदार यांनी ऊळसरालरी खीहुरी इळीरवरी घराश्ररलरळ ऊळसरालरी इळीरवरी या नावाचे त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकिय व निमशासकिय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात, आणी ह्या लेखावरुन असे कळवण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्कात लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Digambar Ishwar Biradar Kamlabai Digambar Biradar यांचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांका१८/०३/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढुल तारीख:-२९/०४/२०२४

(के.डी. सीर्यवंशी )
कनिष्ठ लिपीक
२रे सह दिवाणी न्यायालय
क. स्तर,उदगीर

**आदेशावरुन**
(एस.एम.शेटे)
सहाय्यक अधिक्षक
सहदिवाणी न्यायालय
क.स्तर,उदगीर

वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत

### जाहिरनामा

वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिदूलामा

मा. बी. आर. झेंडे, ४ थे दिवाणी न्यायाधीश क. स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज का. २१२/२०२४

निशाणी क्रमांक ०७

ज्याअर्थी नामे Vishwanth Sangappa Upparbawade हे दिनांक २२/११/२०१९ रोजी Havagiswami Galli ,Udgit Tal- Udgit, Dist-Latur येथे मयत झाले आहेत व अर्जदार

1) Sharanappa Vishwanth Upparbawade , -ge --78 yrs. Occu. Farmer ,
2) Shuresh Vishwanth Upparbawade , -ge --55 yrs. Occu. Farmer,
3) Mangalbai Shankarappa Upparbawade -ge --76 yrs. Occu. Household,
4) Ratish Shankarappa Upparbawade -ge --40 yrs. Occu.--Farmer,

-pplicant R/o Havagiswami Galli ,Udgit Tal- Udgit, Dist-Latur

यांनी खालील नमुद (४) चार व्यती हे मयताचे उत्तराधिकारी असून,

1) Sharanappa Vishwanth Upparbawade , -ge --78 yrs.,--Son ,
2) Shuresh Vishwanth Upparbawade , -ge --55 yrs.,--Son
3) Mangalbai Shankarappa Upparbawade -ge --76 yrs.,--Daughter
4) Ratish Shankarappa Upparbawade -ge --40 yrs.,--Grandson

अर्जदार यांने Vishwanth Sangappa Upparbawade या मयताचे वारस असल्याबाबतचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती दाखविल्या तर सदरहू

कोर्ट सदरहू अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याना सदरहू tishwanth Sangappa Upparbawade याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी,

आज दिनांक १८/०३/२०२४ रोजी साझे सहीनिशी व मां न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख १५/०४/२०२४

( ए. बी. सुर्यवंशी)
कनिष्ठ लिपीक
सह दिवाणी न्यायालय
क. स्तर, उदगीर

आदेशावरुन
(एस.एम. शेटे)
(सहाय्यक अधिक्षक)
सह दिवाणी न्यायालय
क. स्तर, उदगीर